# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०१५ / फाल्गुन २२, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(८)** | **परिवहन मंत्री** | |
| **(९)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८६**

---

**धुळे-सोलापूर राष्ट्रीय मार्गावर ट्रक व एस.टी.बस अपघातातील मृतांच्या वारसांना व जखमींना आर्थिक मदत करण्याबाबत**

**(१) * ११६४५ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहूल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप सोपल (बार्शी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे-सोलापूर राष्ट्रीय मार्गावर चोराखळी नजीकच्या वळण रस्त्यावर ट्रक व एस.टी.बस समोरासमोर येऊन माहे जानेवारी, २०१४ च्या दूसऱ्या सप्ताहात झालेल्या अपघातात ४ जण ठार तर २१ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मृतांच्या कुटूंबियांना तसेच जखमींना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक ०९.०१.२०१५ रोजी सोलापूर विभागातील तुळजापूर आगाराची बस क्र.एम.एच.-१४- बीटी २१६४ ही चोराखळी पासून २ कि.मी. वर आली असता विरुध्द दिशेने येणा-या मालट्रक क्र. आरजे-०७ जीए-४१२४ ने बसला समोरुन धडक दिली व अपघात झाला. सदर अपघातात ४ राज्य परिवहन प्रवासी व एक राज्य परिवहन चालक असे एकूण ५ जण मृत व २१ राज्य परिवहन प्रवासी जखमी झाले.

(२) व (३) सदर अपघाताची पोलीस स्टेशन, येरमाळा यांनी चौकशी केली असून या चौकशीत सदर अपघातास मालट्रक चालकास जबाबदार धरले आहे. पोलीसांनी ट्रक चालकाविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.९/१५ नुसार भा.दं.वि. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ व १८४ या कलमान्वये गुन्हा दाखल केलेला आहे. या अपघाताची रा.प. खात्याने केलेल्या चौकशीत देखील सदर अपघातास ट्रक चालक जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

अपघातग्रस्त ५ मृतांपैकी ३ मृतांचे नातेवाईकांना रा.प.महामंडळातर्फे नियमानुसार प्रत्येकी १०,०००/- प्रमाणे एकूण रुपये ३०,०००/- तात्कालीक मदत देण्यात आली. १ मृताचे नातेवाईकांनी आर्थिक तात्कालीक मदत घेण्यास नकार दिला. तसेच २१ जखमींपैकी १६ जखमी प्रवाशांना प्रत्येकी रुपये १,०००/- व १ प्रवाशास रुपये ५००/- असे एकूण १६,५००/- असे एकंदर रुपये ४६,५००/- ची आर्थिक तात्कालीक मदत देण्यात आली आहे. तसेच अपघात नुकसान भरपाईसाठीचे ‘पी’ फॉर्म देण्यात आले. १ रा.प. प्रवाशी अपघात स्थळावरुन परस्पर निघून गेल्याने त्यास आर्थिक तात्कालीक मदत देता आली नाही. २ जखमी रा.प. प्रवाशांनी आर्थिक तात्कालीक मदत घेण्यास नकार दिला. उर्वरित १ गंभीर जखमी रा.प. प्रवासी दवाखान्यात दाखल होऊन वैद्यकीय उपचार घेत असल्याने त्यास आर्थिक तात्कालीक मदत देण्यात येत आहे.

सदर अपघातात मृत झालेले रा.प. कामगिरीवरील चालक कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ नुसार अपघात नुकसान भरपाई पात्र असल्याने त्यांचे वारसदारास धनादेश क्र.२५२६०७, दिनांक ६.२.२०१५ नुसार रुपये ५,८९,८००/- ची रक्कम नुकसान भरपाईसाठी अदा करण्यात आलेली आहे.

अद्यापपर्यंत कोणत्याही मृताच्या वारसदाराकडून ‘पी’ फॉर्मद्वारे रा.प. महामंडळाकडे अपघात नुकसान भरपाईची मागणी करण्यात आलेली नाही. मात्र, १ जखमी रा.प. प्रवाशाकडून ‘पी’ फॉर्मद्वारे अपघात नुकसान भरपाईची मागणी करण्यात आलेली असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे. एका मृताच्या वारसदाराने उस्मानाबाद कोर्टात एमएसीपी क्र. १५/१५ नुसान १.५० कोटीचा (दीड कोटी) दावा दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मागील ७ वर्षात केंद्र शासनाकडून विविध योजनांसाठी प्राप्त झालेल्या निधीपैकी साडेतीन हजार कोटी रूपयांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(२) * ६६२७ श्री.पराग वाजे (सिन्नर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.तुकाराम काते (अनुशक्तिनगर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठिंबक सिंचनापासून पाणलोट विकासापर्यंत जवळपास १८ योजनांसाठी केंद्र शासनाकडून राज्याला गेल्या ७ वर्षात ४ हजार ९४० कोटी रुपये मिळाले व त्यापैकी केवळ ३ हजार ५६७ कोटी राज्य शासनाने खर्च केलेला नाही हे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भडगांव व पाचोरा (जि.जळगांव) तालुक्यातील १४५० शेतकरी सन २०१२-२०१३ वर्षात राष्ट्रीय ठिबक सिंचन योजनेतून अनुदानासाठी पात्र ठरले होते त्यापैकी ६५१ शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम अद्यापपावेतो मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबबादार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही. ठिबक सिंचन, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत गेल्या सात वर्षात केंद्र शासनाकडून एकूण रु. ४९३६.१६ कोटी निधी प्राप्त झाला असुन त्यापैकी रु. ४६३८.९८ कोटी निधी खर्च झालेला आहे.
(२), (३) व (४) सन २०१२-१३ या वर्षातील पाचोरा व भडगाव तालुक्यातील रु. ७.४७ कोटी एवढ्या रकमेचे २४३८ प्रस्ताव प्रलंबित होते. सदर प्रस्ताव निकाली काढण्यासाठी रु. ५.५९ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०१२-१३ या वर्षासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी सन २०११-१२ या वर्षातील प्रलंबित प्रस्तावासाठी वापरण्यात आल्याने सन २०१२-१३ या वर्षातील प्रकरणांसाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये शेतक-यांना अनुदानाची रक्कम देता आली नाही. सबब यासाठी कोणीही अधिकारी जबाबदार नाहीत. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना शासकीय मदतीसाठी अपात्र ठरविल्याबाबत**

**(३) * ५३१९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पतंगराव कदम (पलूस कडेगांव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये आत्महत्या केलेल्या ९ शेतकऱ्यांपैकी फक्त एकाच कुटूंबाला शासनाने मदतीसाठी पात्र ठरविले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वर्धा जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणा संदर्भात १८ पैकी केवळ ११ प्रकरणे पात्र ठरविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सततची नापिकी, कर्जबाजारीपणा किंवा कर्ज मागण्याचा बँकेचा तगादा याने त्रस्त झालेल्या उर्वरित कुटूंबाला मदत देण्याबाबत तसेच शेतकऱ्यांची आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नागपूर जिल्हयात नोव्हेंबर, २०१४ या महिन्यात एकूण ०६ शेतकरी आत्महत्या प्ररकणे निदर्शनास आली आहेत. यापैकी ०१ प्रकरण शासकीय निकषानुसार पात्र ठरले असून ०२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. उर्वरित ०३ प्रकरणे निर्णयाकरीता प्रलंबित आहेत.

(२) व (३) वर्धा जिल्हयातील १८ शेतकरी आत्महत्या प्रकरणांपैकी ११ प्रकरणे पात्र ठरली असून ०२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. उर्वरित ०५ प्रकरणांची फेरचौकशी करण्यात येवून त्यापैकी ०४ प्रकरणे पात्र ठरली असून ०१ प्रकरण अपात्र ठरले आहे.

(४) शेतकरी आत्महत्ये पात्र प्रकरणी मयत शेतक-याच्या कुटुंबियास रु. १.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते.

शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासन निर्णय दि. १९.१२.२००५ अन्वये शेतक-यांना कर्जाची पुनर्बांधणी, सावकारी कर्जाचे नियमन, स्वयंसहाय्यता गटामार्फत कर्ज वाटप, शेती संलग्न व्यवसायाला चालना सेंद्रिय शेती संलग्न व्यवसायाला चालना सेंद्रिय शेती तंत्रज्ञान अभियान, विदर्भ पाणलोट मिशन इत्यादी उपाययोजना तर्भूत करण्यात आल्या आहेत. तसेच शासन निर्णय दि. २८.०४.२०१४ अन्वये त्यांना आधुनिक शेतीविषयक प्रशिक्षण देणे, त्यांचे समुपदेशन करणे / प्रबोधन करणे, तणावमुक्ती कार्यक्रम आयोजित करणे, केंद्र / राज्य शासनाच्या सोयी सवलतींबाबतची माहिती अवगत करुन त्यांचा लाभ जास्तीत जास्त शेतक-यांना होईल याबाबत कार्यवाही करणे, इत्यादी उपाययोजना अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील ५५१ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(४) * ५७८७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बच्चू कडे (अचलपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अनिल बोंडे (मोर्शी) श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात झालेली गारपीट, अवकाळी पाऊस, कमी प्रमाणात पडलेला पाऊस तसेच नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या आठही जिल्ह्यातील तब्बल ५५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे जानेवारी,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, दिवसेंदिवस वाढत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत तसेच आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटूंबाला आर्थिक मदत मिळण्याबात शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय. औरंगाबाद विभागात सन २०१४ या वर्षात (जानेवारी ते डिसेंबर) एकूण ५७४ शेतकरी आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी चौकशीअंती पात्र ठरलेल्या ४२९ प्रकरणी वारसदारांना प्रत्येकी रु.१.०० लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे. १४३ प्रकरणे आपात्र ठरली असून उर्वरीत ०२ प्रकरणांची चौकशी सुरु आहे.
(३) शेतकरी आत्महत्या पात्र प्रकरणी मयत शेतक-याच्या कुटूंबियास रु.१.०० लक्ष रक्कम देण्यात येते. तसेच आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य उत्पादन शुल्क विभागातील कर्मचाऱ्यांनी लाच घेतल्याबाबत**

**(५) * ९६३४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील राज्य उत्पादन शुल्काच्या गुन्ह्यात जप्त केलेले वाहन परत देण्यासाठी दुय्यम निरिक्षक बाळासाहेब पाटील, पोलीस शिपाई मधुकर राठोड व खाजगी व्यक्ती रामदास कदम यांना २३ हजारांची लाच घेताना अटक केल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) , (२) व (३)

ठाणे येथील राज्य उत्पादन शुल्काच्या गुन्ह्यात जप्त केलेले वाहन परत देण्यासाठी बाळासाहेब पाटील, दुय्यम निरीक्षक व मधुकर राठोड, जवान व खाजगी इसम रामदास कदम यांनी रु. २३, ००० /- इतक्या लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन एकमेकांना सहाय्य केयाची बाब निदर्शनास आल्याने त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे गुन्हा नोंद क्र. II १/२०१५ अन्वये दि. २२.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल केला असून श्री.बाळासाहेब पाटील, दुय्यम निरीक्षक व श्री.मधुकर राठोड, जवान यांना दि. २३.०२.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागभीड तालुक्यात (जि.चंद्रपूर) आयर्न ओरची होत असलेली ओव्हरलोड वाहतुक**

**(६) * ५४८७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात दिनांक ५ जून, २०१४ रोजी आयर्न ओरची ओव्हरलोड वाहतूक केली जात असतांना चंद्रपूरच्या मोटर वाहतूक निरीक्षकांने पाच ट्रकवर कारवाई करुन तीन ट्रक मालकाकडून दंड वसूल करुन रितसर कारवाई केली परंतू त्यापैकी एम.एच. ४० वाय ७८४ व एम.एच. ४० वाय ९८४ या क्रमांकाचे दोन ट्रक कोणत्याही प्रकारचे दंड वसूल न करता व कोणत्याही प्रकारची कारवाई न करता आर्थिक व्यवहारातून मोटर

वाहतूक निरीक्षकाने सदर दोन्ही ट्रक सोडून दिले असल्याची  माहिती दिनांक १३ जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या  प्रकरणाची माहिती माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना होताच फक्त सदर ट्रक मालकाकडून दंडाची रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले परंतू या  प्रकरणामध्ये गैरप्रकार करणाऱ्या मोटार वाहतूक निरीक्षकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात दिनांक ०५ जून, २०१४ रोजी त्यावेळी कार्यरत असलेल्या वायुवेग पथकाद्वारे २०१४ रोजी त्यावेळी कार्यरत असलेल्या वायुवेग पथकाद्वारे ५ वाहनांवर क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक व इतर गुन्हे असल्याचे आढळल्याने अटकावून ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली होती. त्यापैकी ३ ट्रक मालकांकडून रितसर करण्यात आली होती. त्यापैकी ३ ट्रक मालकांकडून रितसर कार्यवाही करुन वसूली करण्यात आली. उर्वरीत २ वाहने एम.एच.४०-वाय-७८४ व एम.एच. ४०-वाय-९८४ ही वाहने सोडविण्यासंबंधी एकच वाहन मालक असल्याने वाहने सोडविण्यासंबंधी एकच वाहन मालक असल्याने दिनांक ०८.०६.२०१४ व दिनांक ११.०६.२०१४ रोजी रितसर अर्ज करुन आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याने प्रकरण न्यायालयात दाखल करावे असा विनंती अर्ज वाहन मालक यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,  चंद्रपूर येथे सादर केला. त्यावर मोटार वाहन निरीक्षक यांनी व खटला विभाग शाखेतील वरिष्ठ लिपिक यांनी वाहन सोडण्यासंबंधी कार्यवाही केली.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणाची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांना झाल्यानंतर त्यांचे कार्यालयाकडून मोटार वाहन मालकाकडून तडजोड शुल्काची वसुली करण्यात आली. तसेच सदर प्रकरणी तत्कालीन वरिष्ठ लिपिक व मोटार वाहन निरीक्षक यांना ज्ञापने देऊन यांच्याकडून खुलासे घेण्यात आले आहेत. सदर प्रकरणाची शासनास माहिती झाल्यानंतर संबंधितांवर कडक कारवाई करुन कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत शासनास सादर करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोईसर (ता.जि.पालघर) येथील शिगाव रस्त्यावर बेकायदेशीर**
**इमारतीचे बांधकाम सुरु असल्याबाबत**

**(७) * १२३४८ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथील शिगाव रसत्यावर सुमारे ६ गुंठे एवढया सरकारी भूखंडाच्या सर्व्हे नं ९२ वर अतिक्रमण करुन इमारतीचे बेकायदेशीर बांधकाम केले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील स्थानिक नागरिकांनी लेखी तक्रार करुनदेखील त्याकडे संबंधित मंडळ अधिकारी, तहसिलदार यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडे दुर्लक्ष करुन पाठीशी घालणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे बोईसर ता. पालघर येथील स.नं. ९२ व स.नं. १७६/६ प्लॉट नं. ६५ या शासकीय जमिनीलगत स.नं.३४ ही खाजगी मालकीची जमीन आहे. या क्षेत्रात सुरु असलेले बांधकाम नेमक्या कोणत्या जमिनीवर सुरु आहे हे सकृतदर्शनी स्पष्ट होत नसल्याने सदर जमिनींच्या हद्दी उपधिक्षक भूमी अभिलेख, पालघर यांचेकडून निश्चित करुन घेण्यात येत आहेत. दरम्यान बांधकामाचे संदर्भात संबधितांवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार डिसेंबर २०१४ मध्ये नोटीस बजावण्यात आली आहे.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीमधील नोकर भरतीत झालेला गैरव्यवहार**

**(८) * ११२७८ श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात झालेल्या तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचा-याच्या भरतीत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तातडीने चौकशी करण्यात यावी अशी सर्व पक्षीय लोकप्रितनिधीनी शासनाकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही

केली आहे,

(४) या प्रकरणाची अदयापही चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य सहकारी दुध महासंघ मर्या.महानंद, मुंबई या संस्थेत कोटयवधी रूपयांचा अपहार करणा-या महानंदच्या संचालकांची चौकशी करण्याबाबत**

**(९) * ८४७० श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शहर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत महानंद दुग्धशाळेत कोट्यावधी रुपयांचा अपहार करणा-या संचालकांची चौकशी करण्याचे आदेश राज्य शासनाने दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारासदिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाच्या अंमलबजावणीची चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार भ्रष्टाचार करणा-या संचालकांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. महानंद गोरेगाव (पूर्व) यांचे सन २००९-१० व सन २०१०-११ या कालावधीच्या लेखापरीक्षणामधील आक्षेपांबाबत सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश दि. ०५/०१/२०१४ रोजी निर्गमित केले आहेत.

(२) सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि. ०५/०१/२०१४ रोजी चौकशी करण्याचे आदेश निर्गमित केले असून चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या संगणक साक्षरतेसाठी सुमारे २७ लाख रुपये मंजूर निधीचा वापर केला नसल्याबाबत

**(१०) * ५७२३ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या संगणक साक्षरतेसाठी सन २०१३ मध्ये सुमारे २७ लाख रुपये निधी मंजूर केला परंतु राज्य शासनाने वारंवार मुंबई महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करुनही शिक्षण खात्याने वर्षभरात निधीचा वापर केला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निधीचा वापर न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) सर्व शिक्षा अभियांनातर्गत मुंबई महानगरपालिकेच्या १२ उर्दू शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा निर्मितीसाठी सन २०१३ मध्ये २७.१२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. तथापि, दर कराराची यादी जानेवारी, २०१४ मध्ये उपलब्ध झाली असून त्यानुसार फेब्रुवारी, २०१४ मध्ये विविध संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात आली असून त्यास अद्याप महानगरपालिकेने मान्यता दिलेली नाही. सन २०१५-१६ मध्ये प्रत्येक शाळेला संगणक प्रयोगशाळा इंटरनेटसहित देण्याचा नियोजन आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यात पुनर्वसनाचे बनावट दाखले तयार करुन दौंड व शिरुर तालुक्यातील सुमारे ९०० एकर जमीन धरणग्रस्त नसलेल्या व्यक्तींना वाटप झाल्याचा प्रकार

**(११) * ५२७७ श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शहर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पुनर्वसनाचे बोगस दाखले तयार करुन दौंड व शिरुर तालुक्यातील सुमारे ९०० एकर जमीन धरणग्रस्त नसलेल्या व्यक्तींना वाटप झाल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणा-या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.
असा प्रकार जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेला नाही तथापि दौंड तालुक्यातील ७७३ हेक्टर जमीन वाटपाबाबत हा प्रकार सन १९९७ ते २००० चे दरम्यान झाल्याचे दिसुन येते आणि सन २००० चे दरम्यान निदर्शनास आला आहे.
(२) होय, सदरहू प्रकरणी बनावट सही व शिक्क्यासह पर्यायी जमीन वाटपाचे आदेश केलेले प्रकरणांचा शोध घेऊन त्यापैकी संशयास्पद असल्याचे निदर्शनास आलेल्या प्रकरणांची माहिती उपविभागीय अधिकारी, बारामती यांना जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केली होती. त्यापैकी ९६ प्रकरणांची फेरतपासणी करुन अंतिम कार्यवाही करुन ३३० एकर जमीन सरकार जमा केलेली आहे. उर्वरीत प्रकरणांत फेरतपासणी करुन सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.
(३) दोषी अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन निलंबनाची कार्यवाही करणेत आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पुनस महसूल मंडळातील आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(१२) * ९३६८ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यातील काही आंबा बागायदारांना गेल्यावर्षी अतिउष्णतेमुळे आंबा फळपिकाची मोठ्या प्रमाणात गळती झाल्याने लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झालेल्या फळपिक विमा योजनेतील सहभागामुळे नुकसान भरपाई मिळाली मात्र पुनस महसूल मंडळातील १० हून अधिक गावातील शेतकरी व आंबा बागायतदारांना अद्यापही या नुकसान भरपाईपासून वंचित राहिल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तदनुसार उक्त नुकसानभरपाई तात्काळ देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२) हवामानावर आधारित फळपिक विमा योजनेच्या विमा प्रमाणकानुसार व स्वयंचलित हवामान केंद्रावर नोंद झालेल्या आकडेवारीनुसार सन २०१३-१४ मध्ये लांजा तालुक्यातील पुनस महसूल मंडळातील आंबा या फळपिकास नुकसान भरपाई देय होत नाही.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयाची रब्बीचा जिल्हा अशी नोंद असल्यामुळे
खरीप पीक नुकसान भरपाई मिळत नसल्याबाबत**

**(१३) * १०५६४ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४-२०१५ मध्ये पुरेसा पाऊस नसल्यामुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी शासनाने तब्बल ४ हजार ८०३ कोटी रूपयांचा निधी मंजूर केला आहे, मात्र सोलापूर हा रब्बीचा जिल्हा अशी नोंद केल्याने जिल्हयात खरीप पिकांचे नुकसान होऊनही नुकसान भरपाई मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार सोलापूर जिल्हयात खरीप पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना खरीप पिकांच्या नुकसानीची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) पिक पैसेवारी पध्दतीच्या प्रचलित नियम / तरतुदी या नुसार खरीप व रब्बी अशी दोन्ही पिके घेणा-या गावांमध्ये लागवडी खालील एकूण पिकाच्या २/३ किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्र हे खरीप असल्यास रब्बी हंगामाची वाट न पाहता पैसेवारी जाहीर करण्यात येते. सोलापूर जिल्हयातील खरीप लागवडीची एकूण लागवडीलायक क्षेत्राशी टक्केवारी १४.०५% इतकी आहे. तद्नुसार जिल्हयाची खरीप हंगामाची पैसेवारी निरंक आलेली असल्याने शासनाने खरीप २०१४ हंगामातील बाधीत शेतक-यांना मंजुर केलेल्या निधीत सदर जिल्हयाचा समावेश करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी अवैध वाळू उपसा व डोंगर
फोडीचे प्रकार मोठया प्रमाणात सुरु असल्याबाबत**

**(१४) * ८३२७ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी अवैध वाळू उपसा व डोंगर फोडीचे प्रकार मोठया प्रमाणात सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाळू माफियांना संबंधित विभागाचे काही अधिकारी मदत करत आहेत तर काही अधिका-यांवर वारंवार हल्ले होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या

आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मदत करणाऱ्या अधिका-यांमुळेच डोंगर फोडी आणि वाळू उपसा करणा-या वाळू माफियांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने पर्यावरणाचा प्रचंड प्रमाणात -हास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(६) असल्यास, त्यानुसार वाळू तस्करांना मदत करणाऱ्या अधिकारी तसेच वाळू तस्करी करणा-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,

(७) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) बीड जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आलेली असुन, अशा भरारी पथकांनी सन २०१४-२०१५ मध्ये केलेल्या तपासणीत ४६३ प्रकरणांत रुपये ७१,७९,१३८/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात तहसिलदार माजलगांव यांचेवर हल्ला झाला होता. सदर आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करुन, संबंधितास अटक करण्यात आली आहे.

वाळू माफियांना संबंधित विभागाचे अधिकारी पाठीशी घातल असल्याचे निदर्शनास आले नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील विविध प्रकल्पा अंतर्गत प्रकप्ल्पग्रस्त झालेल्या रहिवाशांचे पुनर्वसना बाबत

**(१५) * १०१२९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मेट्रो-मोनो रेल्वे, स्कायवॉक, लिंक रोड आदी महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या ४० हजाराहून अधिक लोकांचे पुनर्वसन करण्यात आले परंतू अजूनपर्यंत साडेपाच हजार प्रकल्पग्रस्त लोकांचे पुनवर्सन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील साडेपाच हजार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## लातूर जिल्ह्यात विजेचे बिल अंदाजीत रिडींगनुसार देत असल्याबाबत.

**(१६) * ११४३० श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात मोठया प्रमाणावर ग्राहकांवर विजेचे बिल अंदाज रिडींग घेवुन देण्यात आल्याचा प्रकार जानेवारी २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, महावितरण कंपनींने सहा महीन्यांपूर्वीच बसविलेल्या नविन मिटर मध्ये दोष निर्माण झाल्याने मिटर रिडींगची नोंद घेता येत नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोष पुर्ण मिटर्स पुरविणा-या कंपनीवर तसेच ही मिटर्स खरेदी करणा-या अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील यंत्रमागासह इतर औद्योगिक वीज ग्राहकांच्या वीज दरातील सवलतीपोटी शासनाकडून महावितरण कंपनीस देण्यात येणारे अनुदान बंद केल्याबाबत

**(१७) * ८५१९ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमागासह इतर औद्योगिक वीज ग्राहकांच्या वीज दरातील सवलतीपोटी शासनाकडून महावितरण कंपनीस देण्यात येणारे अनुदान बंद केल्यामुळे वीजेच्या दरात माहे नोव्हेंबर, २०१४ पासून तिप्पट वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दरवाढीमुळे राज्यातील लघु व मध्यम उद्योजक मोठया आर्थिक अडचणीत सापडल्यामुळे राज्यभरातून या वीज दरवाढीस विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी यंत्रमाग उद्योगास कृषी प्रमाणेच सवलतीचा वीजदर लागू करण्याची मागणी शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.
(२)होय.
(३) होय.
(४) याबाबत महावितरण कंपनीकडून अभिप्राय मागवून घेण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू येथील तलासरी तालुक्यातील वडवली आदिवासींना वाटप झालेल्या भूखंडापैकी मोक्याच्या भूखंडाची कागदोपत्री अदलाबदल केल्याबाबत**

**(१८) * ७५७० श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू येथील तलासरी तालुक्यातील वडवली येथील आदिवासींना वाटप झालेल्या सर्व्हे नंबर १९१ या भूखंडापैकी मोक्याचा भूखंड कागदोपत्री बदल करुन त्या ठिकाणी भूमाफियांनी बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींना वाटप झालेल्या भूखंडाची संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, व त्यानुसार सदर भूमाफियांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**गोदावरी नदीच्या पात्रात बेसुमार अवैध वाळू उपसा सुरू असल्याबाबत**

**(१९) * ११८७४ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी नदीच्या पात्रात सुरू असलेल्या बेसुमार वाळू उपशामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील आपेगाव आणि बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील कुरणपिंपरी या गावांना जोडणारा पूल दि. ८ नोव्हेंबर, २०१४ रोजी खचून पूलाला जागोजागी तडे गेल्यामुळे या दोन्ही तालुक्यातील संपर्क तुटला आहे, हे खरे आहे काय,
(२) गोदावरी नदीच्या पात्रात बेसुमार अवैध वाळू उपसा सुरू असतानाही महसूल विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील अनेक वर्षापासून गोदावरी नदीच्या पात्रात सुरू असलेल्या बेसुमार वाळू

उत्खननाला परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास अद्यपी कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**मु.देवघर (ता.म्हसळा, जि.रायगड) येथे विनापरवाना डबर उत्खननाचे काम सुरू असल्याबाबत**

**(२०) * १२०७५ श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.देवघर (ता.म्हसळा, जि.रायगड) येथे सर्व्हे नं.३६ मध्ये ग्रामपंचायतीत व जिल्हाधिकारी रायगड यांची परवानगी नसतानाही अनधिकृपणे मोठ्या प्रमाणात स्फोट घडवून डबर उत्खननाचे काम गेले वर्षभर चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या डबर उत्खनन व स्फोटामुळे देवघर बौध्दवाडी व देवघर गावामध्ये मोठ्या प्रमाणात घरांना हादरे बसून तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उत्खनना विरूध्द ग्रामपंचायतीने आणि ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी रायगड, तहसिलदार म्हसळा, पोलीस निरीक्षक म्हसळा यांच्याकडे अनेकवेळा लेखी तक्रार करण्यात येऊनही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मागील वर्षभरात असे निदर्शनास आले नाही.

(२) सद्यस्थितीत प्रश्नाधीन ठिकाणी उत्खनन बंद असल्याने अशी बाब नाही. तथापि, मंडळ अधिकारी म्हसळा यांनी पूर्वी दिनांक १३/१२/२०१२ रोजी केलेल्या चौकशीतील पंचनाम्यानुसार मौजे देवघर- बौध्दवाडी येथील तीन घरांना तडे गेल्याचे निदर्शनास आले होते.

(३) ग्रामपंचायत देवघर यांनी मौजे देवघर येथील सर्वे नंबर ३६ मधील खाणीला ग्रामस्थांचा विरोध असल्याबाबत दिनांक १३/१२/२०११ रोजी ठराव केल्यानंतर, सदर ठिकाणी उत्खननास परवानगी देण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इगतपुरी तहसिल कार्यालयासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम ही निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२१) * ९१९८ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तहसिल कार्यालयासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची बाब माहे जानेवारी २०१५ मध्ये उघडकीस आली हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदरहू इमारतीचे काम पुर्ण होऊन देखील ती विनावापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीचे काम करतांना चुकीची जागा निवडली गेल्याचा आरोप शासनावर केला जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, इमारतीचे निकृष्ट कामाची शासनाने चौकशी केली काय व चौकशीत काय आढळून आले व त्या नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१),(२) व (३) अशा स्वरुपाची बातमी काही वृत्तपत्रात दिनांक २३ जानेवारी,२०१५ रोजी प्रसिध्द झाली होती. तथापि इगतपुरी तहसिल कार्यालयाच्या नविन इमारतीची जागा इगतपूरी व लगतच्या परिसरात उपलब्ध असलेल्या जागेतून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी निवडली आहे. सदर इमारतीचे बांधकाम भौतिकदृष्ट्या जरी पुर्ण झालेले असले तरी सदर इमारतीची कुंपण भिंत, पथदिवे, डांबरी रस्ता व फर्निचर इत्यादी कामे करावयाची आहेत. त्यामुळे सदर इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप घेण्यात आला नाही. अशा परिस्थितीत सदर इमारत जिल्हाधिकारी यांच्या ताब्यात येवूनही वापराविना पडून आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तोंडवळी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या समुद्रकिनारी खाडीतून बेकायदेशीररित्या वाळु उत्खनन होत असल्याबाबत**

**(२२) * ८४१७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील तोंडवळी या समुद्रकिनारी वसलेल्या गावातील खाडीतून मागील तीन वर्षापासून बेकायदेशीररित्या वाळू माफियांकडून वाळु उत्खनन व वाहतुक प्रचंड प्रमाणात होत असल्याचे माहे जानेवारी,२०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्रीच्या वेळी अंधारात होणाऱ्या बेकायदा वाळु उत्खनन व वाहतुकीमुळे

अपघातांना व चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी तेथील ग्रामस्थांनी दिनांक १२ जानेवारी,२०१५ च्या सुमारास जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग, तहसिलदार, मालवण यांचेकडे लेखी तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत स्थानिक महसूल प्रशासन व वाळू माफिया यांच्या संगनमताने एकाही वाळु माफियाविरोधात कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेकायदेशीररित्या वाळु उत्खनन व वाहतुक केल्याने शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या वाळुमाफियांवर तसेच महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मालवण तालुक्यातील अवैध वाळू उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मालवण तालुक्यात गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तहसिलदार कार्यालयाकडून मंडळस्तरावर भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर पथकाद्वारे मालवण तालुक्यात मार्च, २०१४ पासून १२३ प्रकरणांत रुपये २३,३६,८८७/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. त्यापैकी, मौजे तोंडवळी येथील प्रकरणांमधील रुपये ३,५१,६००/- इतक्या रकमेचाही समावेश आहे.

तहसिलदार मालवण यांनी वाळू/रेतीचे अवैध उत्खनन करण्यासाठी वापरात येत असलेली मौजे तोंडवली येथील १ व इतर ठिकाणी ३ अशा चार बोटींना सिल केले आहे. तसेच मौजे देवली, आंबेरी, मसुदे व धामापूर येथील ७२ रॅम्प निकामी करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्व औद्योगिक ग्राहक व तीनशे युनिटच्या आतील घरगुती वीज ग्राहकांचे वीजदर वाढल्याबाबत

**(२३) * ११७५१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व औद्योगिक ग्राहक व तीनशे युनिटच्या आतील घरगुती वीज ग्राहकांचे वीजदर १ डिसेंबर २०१४ पासून वाढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आणखी बारा टक्के वीजदर वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याविरोधात राज्यभरात संघर्ष करणाऱ्या विविध संघटनांनी व्यापक परिषद दिनांक ३.२.२०१५ रोजी मुंबईतील आझाद मैदानाजवळील पत्रकार भवनात आयोजित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व वीज दर वाढीस सदर परिषदेत तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) होय.

(५) विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चत करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. एकूण महसूलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरिता महाराष्ट्र विघुत नियामक आयोग यांच्याकडे वितरण कंपनीतर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा. आयोगातर्फे वीज दरबाबत निर्णय घेण्यात येतो व त्यानुसारच वितरण कंपनीकडून वीज दराची आकारणी करण्यात येते. महावितरण कंपनीकडून सुधारीत बहुवार्षिक वीजदर यांचिका दि.०३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वीज आयोगाकडे सादर केली असून महावितरणची एकूण महसुलातील तुट पहाता. अंदाजे ८ % इतकी दरवाढ प्रस्तावित केली असून वीज दर आयोगाकडून निश्चित करण्यात येणार आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**टेकेपार (जि.भंडारा) उपसा सिंचन प्रकल्पाचे विद्युत बिल भरले नसल्यामुळे महावितरण कंपनीने ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर वीजपुरवठा खंडीत केल्याबाबत**

**(२४) * ९७४३ श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील टेकेपार उपसा सिंचन प्रकल्प मागील १६ वर्षापासून सुरू असून या प्रकल्पामुळे परिसरातील ४१ गावातील ६ हजार हेक्टर शेती ओलिताखाली आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरळीत सुरू असलेल्या या प्रकल्पाचे विद्युत बिल भरले नसल्यामुळे माहे डिसेंबर, २०१४ दरम्यान महावितरण कंपनीकडून वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर वीजपुरवठा खंडीत केल्यामुळे परिसरातील शेतकरी उन्हाळी धानाच्या लागवडीला मुकला असल्याचे लक्षात घेता वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्यासंबंधी काय उपाययोजना करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय
(२) होय
या प्रकल्पाचे विदयुत बील न भरल्यामुळे महावितरण कंपनीकडून दि. १३.१२.२०१४ रोजी वीज पुरवठा खंडीत करण्यात आला होता.
(३) थकीत विदयुत देयकाची अदायगी क्षेत्रीय कार्यालयाकडून दिनांक २३.१२.२०१४ रोजी करण्यात आली व विदयुत पुरवठा पूर्ववत सुरु करुन धान पिकाकरिता सिंचन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**स्वातंत्र्य सैनिकांच्या गोवा मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेला पर्यायी जागा देण्याबाबत**

**(२५) * ७४९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र्य सैनिकांच्या गोवा मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेला मूंबईतील मौजे वर्सोवा सी.टी.एस.क्र १६१ लगतची खाडी जमीन अभिन्यास भाग क्र. ७ क मधील भूखंड क्र. ५ दिनांक १७/७/१९९८ रोजी मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा भूखंड सी.आर.झेड मुळे बाधित झाल्याने संस्थेने पर्यायी दुसरी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्वातंत्र्य सैनिकांच्या सहकारी संस्थेला पर्यायी भूखंड देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली जात आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) स्वातंत्र्यसैनिकांच्या गोवा मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेला मौ.वर्सोवा, स.नं. १६१ लगतची खाडी जमीन अभिन्यास क्र. ७ क मधील भूखंड क्रमांक ५ चे ६७५ चौ.मी. अधिक रस्त्याचे अतिरिक्त चटईक्षेत्र ३६० चौ.मी. असे एकूण १०३५ चौ.मी. क्षेत्र शासन ज्ञापन, दिनांक ७.७.१९९७ अन्वये व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे आदेश दिनांक १८.७.१९९८ अन्वये मंजूर करण्यात आले होते.
(२) होय.
(३) व (४) सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन वाटप करण्याबाबतचे सुधारित धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर सदर संस्थेच्या अर्जासंदर्भात उचित निर्णय घेण्यात येईल.

-----------------

**दीव, दमण व गोवा या भागातून उत्पादन शुल्क चुकवून राज्यात आणण्यात येणारा मद्यसाठा**

**(२६) * ८७९१ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दीव, दमण, गोवा या भागातून मोठ्या प्रमाणात उत्पादन शुल्क चुकवून मद्यसाठा आणण्याचे प्रकार सर्रासपणे सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच नुकतेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत सुमारे अडीच कोटी रुपयांहून अधिक मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त प्रकरणी सुमारे २ हजारांहून अधिक आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले,
(५) तद्नुसार यास आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दीव, दमण व गोवा या भागातून मोठया प्रमाणात उत्पादन शुल्क चुकवून मद्यसाठा आणण्याचे प्रकार सर्रासपणे सुरु आहेत हे खरे नाही. तथापि दमण व गोवा या ठिकाणाचे मद्याचे दर महाराष्ट्राच्या तुलनेत कमी असल्याने त्या ठिकाणाहून काही प्रमाणात मद्यसाठा चोरुन आणण्याचे प्रकार आढळून आले आहेत.
(२), (३) व (४) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिका-यांनी सतत कार्यवाही करुन माहे एप्रिल २०१४ ते माहे फेब्रुवारी २०१५ अखेर दमण व गोवा निर्मित मद्याशी निगडीत ७८० गुन्हे नोंद करुन ४३६ आरोपींना अटक केली तसेच गुन्ह्यातील वाहने व अवैध मद्य असा सुमारे रुपये ३.७४ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.
(५) सीमाभागात सातत्याने क्षेत्रीय अधिकारी व भरारी पथकाचे अधिका-यामार्फत गस्त घालण्यात येते व संशयीत वाहनांची तपासणी करण्यात येते.तसेच सीमा तपासणी नाके उभारुन त्याद्वारे अवैध वाहतुकीवर नियंत्रण मिळविण्याची कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**रामटेक-पारशिवनी (जि.नागपूर) परिसरातील शेतक-यांना कृषी विभागाकडून वेळेवर खत पूरवठा होत नसल्याबाबत**

**(२७) * ९५३५ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक - पारशिवनी येथील शेतक-यांना कृषि विभागाकडून पुरविण्यात येत असलेले खत वेळेवर मिळत नसल्याने त्यांना खाजगी दुकानांमधून अधिक भावाने विकत घ्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, या खाजगी दुकानदारांकडून शेतक-यांची फसवणूक केली जात आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषि विभागाकडून पुरविण्यात येत असलेले खत वेळेवर न मिळण्याची करणे काय आहेत,
(४) तसेच या संदर्भात शेतकत-यांना पुरविण्यात येत असलेले खत वेळेवर न देणारे तसेच खाजगी दुकानांमधून अधिक भावाने खत देणारे दुकारनदार यासर्व बाबतीत जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) खतांचा पुरवठा वेळेवर व पुरेशा प्रमाणात करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील सातबारावरुन देवस्थान, ईदगाह संस्थान यांची नावे अनधिकृतपणे वगळयात आल्याबाबत

**(२८) * ५६४८ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील नालेगाव गट क्र.१९, आसेगाव सर्वे नं.१६,१७८,१७९,१८ औंढा नागनाथ, तपावेन सर्वे नं.३१,३५,५६ पेरजाबाई गट नं.३१,३२,३३, चिंचोली गट क्र.४१,४२,४३,४४,१०५,१०७,१०८,१२३, टाकळगव्हाण, गांगलवाडी अशा ८ गावांत ईनामी व देवस्थानची ४०० वर जमिन असून या जमिनीवर खाजगी व्यक्तींनी अनाधिकृत ताबा घेऊन सातबारावरुन देवस्थान, ईदगाह संस्थान यांची नावे गायब करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती जमिनी गायब करणा-या संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) प्रश्नाधीन प्रकरणी प्राप्त तक्रारी तसेच संबंधित जमिनीचे अभिलेख यांची पडताळणी करुन  सखोल चौकशी अहवाल शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी,हिंगोली व जिल्हाधिकारी, परभणी यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(३) व (४) जिल्हाधिकारी, हिंगोली व जिल्हाधिकारी, परभणी यांचे चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**सातारा जिल्हयातील सहयाद्रीच्या पठारावर पवन उर्जा प्रकल्पांनी ग्रामपंचायतींना मिळणारा कर थकविला असल्याबाबत**

**(२९) * १०१९३ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील सहयाद्रीच्या पठारावर मोठ्या प्रमाणात पवनउर्जा प्रकल्पांनी अपाआपले प्रकल्प उभारले असून जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या हद्दीत तब्बल १६४४ पवनचक्क्या उभारल्याची नोंद झाली असून उभारलेल्या पवनचक्की कंपन्यांनी सुमारे ३० कोटी ४५ लक्ष रुपयांचा ग्रामपंचायतींना मिळाणारा कर थकविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या ग्रामपंचायतींच्या हद्दीत  कंपन्यानी पवनचक्क्या उभारल्या आहेत त्या पवनचक्की कंपनीने तातडीने त्याचा होणारा कर संबंधित ग्रामपंचायतीकडे भरणे राज्य शासनाने बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाच्या धोरणानुसार संबंधित ग्रामपंचायतीनी या थकलेल्या करांची मागणी संबंधित पवनचक्की प्रकल्पाकडे करुनही संबंधित कंपन्या ग्रामपंचायतींना कर देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशी नुसार राज्य शासन सदरचा थकेलेला कर वसूल करणेसंबंधी कोणता निर्णय घेणार, आहे वा घेण्यात येणार आहे
(५) असल्यास, चौकशी न करण्याची व निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**अकोला जिल्हयातील बनावट बियाणे पूरविणा-या कंपनीकडे पून्हा नव्याने परवाना दिल्याबाबत**

**(३०) * ६००६ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बनावट बियाणे पुरविणा-या एका कंपनीला अवघ्या दोन महिन्यात पुन्हा परवाना देण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ जून, २०१४ रोजी दुर्गा इंडस्ट्रीज अकोला या कंपनीमध्ये सोयाबीन इ. पिकांचे अप्रमाणीत बियाणे प्रमाणित असल्याचे टॅग लावून पॅकींग करताना पकडल्यामुळे गुणवत्ता नियंत्रण विभागाने गुन्हे दाखल केलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

मे.इंडो अॅग्रो जिनेटीक्स सिड्स, देवास (म.प्र) ही बियाणे उत्पादक कंपनी मध्य प्रदेशातील असल्याने व सदर कंपनीस महाराष्ट्रामध्ये परवाना नसल्याने सदर कंपनीला पुन्हा परवाना बहाल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) मे.इंडो अॅग्रो जिनेटीक्स सिड्स, देवास मध्य प्रदेश या कंपनीच्या सोयाबीनच्या बियाण्यांवर मे. दुर्गा अॅग्रो इंडस्ट्रीज, आकोट जि.अकोला येथे अवैधरित्या प्रक्रिया करण्यात येत असल्याचे आढळून आल्याने ते जप्त करुन ५ आरोपींविरुध्द गु.नो.क्र. १०६/२०१४ अन्वये आकोट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. २ आरोपींना अटक करण्यात आलेली असून ३ आरोपींना माननीय न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे. पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोवळकोट कदम बौध्दवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ) येथील जुलै २००५ मधील अतिवृष्टी व पूर यामुळे बाधीत झालेल्या २७ कुटुंबाचे कायमस्वरूपी पुनर्वसन दुसऱ्या जागेत करण्याबाबत**

**(३१) * १२४३१ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवळकोट कदम बौध्दवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील जुलै २००५ मधील अतिवृष्टी व पूर यामुळे बाधीत झालेल्या २७ कुटुंबाचे पुनर्वसन शासकीय जागेत निश्चित करण्यात आले होते परंतु सदर जागा डोंगर उताराची असल्याने स्थानिकांचा या पूनर्वसनाला विरोध असल्यामुळे त्यापैकी १५ कुटुंबाचे कायमस्वरूपी पुनर्वसन दुसऱ्या जागेत करव्याबाबतचा प्रस्ताव यापूर्वीच कायस्वरूपी रत्नागिरी यांचेकडे मंजूरीसाठी सादर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे सदर आपत्तीबाधीत कुटुंबामध्ये नाराजी असून त्यांनी आंदोलनाचा इशारा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी याबाबत तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्री यांना वारंवार निवेदन देऊन विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) होय.
(४) पूनर्वसनासाठी स्थानिकांचे विनंतीनुसार सर्व्हे क्रमांक १२७ ची दिनांक २४/१२/२०१४ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणेत आली. सदर जागा सी.आर. झेड मध्ये असल्याने पर्यायी जागेची पाहणी कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**नोंदणी व मुद्रांक विभाग, हवेली क्र.२ (ता.हवेली, जि.पुणे) येथील मशीनची चोरी झाल्याबाबत**

**(३२) * ९७०८ श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नोंदणी व मुद्रांक विभाग, हवेली क्र.२ (ता.हवेली, जि.पुणे) येथून सन २००५ मध्ये चोरीस गेलेल्या ७ कोटी ७७ लाख मुद्रांक शिल्लक असलेल्या फ्रकिंग मशीनचा शोध अद्याप लागला नसल्याची बाब माहे जानेवारी, २००५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानूसार दोषी असणाऱ्यानवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे. परंतु सदर फ्रँकींग मशीनमध्ये शिल्लक असलेली रक्कम रु. ६.७६९५ कोटी एवढी आहे.
(२) व (३) होय. स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून, फिर्याद खरी असल्याचे परंतु आरोपी मिळाला नसून आरोपी मिळताच पुढे तपास चालू केला जाईल, असा अहवाल देण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधीत अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून जबाबदार असणा-या व्यक्तींवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**भंडारा व वाशिम जिल्हयातील शेतक-यांना नुकसान भरपाई वितरीत झाली नसल्याबाबत**

**(३३) * ८८२२ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात सन २०१३-२०१४ मधील अतिवृष्टीमुळे धान उत्पादकांसाठी जाहीर केलेली नुकसान भरपाईपासून शेतकरी वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्हयात दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे घरासह शेतीपिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले त्यावेळी तात्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी स्वत: पाहणी करुन व पंचनामे होऊन सुध्दा अद्यापपर्यंत शेतक-यांना मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, शेतक-यांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे आहे.
निधी प्राप्त करुन घेण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**मुंबई - अहमदाबाद महामार्गाच्या रूंदीकरण व चौपदरीकरण करण्यासाठी संपादीत जमिनीचा मोबदला अद्याप शेतकऱ्यांना दिला गेला नसल्याबाबत**

**(३४) * ५८८९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई -अहमदाबाद महामार्गाच्या रूंदीकरण व चौपदरीकरण करण्यासाठी संपादन करण्यात आलेल्या जमिनीचा आदिवासी शेतक-यांना मोबदला अद्यापपर्यंत मिळाले नसल्याने १२ गावातील शेकडो आदिवासी नाराज असल्याने आदिवासी पुनर्वसन आंदोलन समितीतर्फे स्वातंत्र्यसैनिक, निवृत्त तहसिलदार रा.वि.भुस्कुटे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी तीव्र आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अनेक वर्षापासून मोबदला मिळविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व उपविभागीय अधिकारी डहाणू यांच्याकडे लेखी तक्रार व अनेक वेळा आंदोलन करूनसुध्दा दखल घेतली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने रितसर चौकशी केली असता आदिवासींना जमिनीचा मोबदला तातडीने देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास,विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

आदिवासी पुनर्वसन आंदोलन समितीने प्रथम दि. १८ मे, २०१२ रोजी व नंतर फेब्रुवारी, २०१४ मध्ये आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही.

आदिवासी पुनर्वसन आंदोलन समिती यांचेशी वेळोवेळी चर्चा करण्यात येऊन त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन जिल्हाधिकारी, पालघर, ठाणे, उपविभागीय अधिकारी, डहाणू, व्यवस्थापक (तांत्रिक) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु., सुरत (एक्सप्रेसवे) यांचेकडून करणेत आले आहे.

(३) उप विभागीय अधिकारी, डहाणू यांचे अध्यक्षतेखालील दि. १६.६.२०१२ रोजीच्या बैठकीस तहसिलदार, पालघर, समितीचे प्रतिनिधी व प्राधिकरणाचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी ४१ खातेदारांनी सादर केलेल्या अर्जाची तपासणी करण्यात येऊन प्राप्त अभिलेखानुसार सदर ४१ खातेदारांना मोबदला देण्यात आल्याचे व्यवस्थापक (तांत्रिक), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु. सुरत यांनी त्यांच्या अहवालात नमूद केलेले आहे. भूधारकाशी याबाबत संवाद साधून सहापदरीकरणाचे काम जवळ - जवळ पूर्ण करण्यात आले आहे. तसेच या भागातील सहा पदरीकरणांच्या निवाड्याचे वाटपही बहुतांशी पूर्ण करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## अवकाळी पाऊस व गारपीट ग्रस्त शेतक-यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नसल्याबाबत

**(३५) * ७२४२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुभाष साबने (दिंडोशी), श्री.भारत भालके (पंढरपूर-मंगळवेढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे डिसेंबर २०१४ मध्ये राज्यात अवकाळी पाऊस व गारपीटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना २६ जानेवारी २०१५ पर्यंत त्यांच्या पिकांच्या नुकसानी पोटी भरपाईची रक्कम जमा करण्याचे आदेश सरकारने देवूनही सोलापूर जिल्हयातील सांगोला, मंगळवेढा या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ज्वारीचे नुकसान होवूनही आजतागायात  नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(२) गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) माहे एप्रिल व मे २०१३ मध्ये अवेळी पाऊस गारपीट यामुळे नुकसान झालेल्या ५२ शेतकऱ्यांच्या नुकसानीचा प्रस्ताव पाठवून माहे डिसेंबर २०१४ अखेर नुकसान भरपाई रक्कम मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) सांगली, मिरज शहरासह सांगली जिल्हयात दिनांक १ व २ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्षे, डाळींब बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती नुकसान भरपाई रक्कम जमा न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करुन शेतकऱ्यांना व बागायतदारांना तात्काळ आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१४ मध्ये सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यात अवकाळी पावसाने ३४०० हेक्टर, तर सांगाला तालुक्यात अवकाळी पावसाने १३७.११ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले, सदरचे नुकसान हे ५० टक्केपेक्षा कमी असल्याने केंद्र शासनाच्या निकषांनुसार नुकसानीच्या क्षेत्रास मदत अनुज्ञेय नाही.

(२) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यात माहे मार्च, एप्रिल व मे- २०१३ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे ५.८४ हेक्टर क्षेत्राचे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले होते. त्यानुषंगाने बाधित झालेल्या ३६ शेतक-यांना मदत वाटपासाठी रु.६८९८०/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. सदर निधी बाधति शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तेलगाव तिरंगी मार्गावर (ता. कळमेश्वर, जि.नागपूर) अत्युच्च दाबाची टॉवरलाईन टाकल्याने शेतक-यांच्या बोअरवेल निकामी झाल्याबाबत**

**(३६) * ५९०१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर जि.नागपूर तालुक्यापासून ३० कि.मी. अंतरावर असलेल्या तेलगाव तिरंगी मार्गावर जमिनीपासून केवळ ४० फूट उंचीवरुन अत्युच्च दाबाची टॉवरलाईन टाकण्यात आल्यामुळे अनेक शेतक-यांच्या बोअरवेलच्या मशीन जळून बोअरवेल निकामी झाल्यामुळे शेतक-यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टॉवरलाईनमुळे बोअरवेलचे होत असलेले नुकसान थांबविण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतक-यांना झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दूध संघ महानंदला नियमितपणे दूध पुरवठा करित नसल्याबाबत**

**(३७) * ६४३२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबने (देगलूर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महानंद) सदस्य असलेल्या दूध संघांना महानंदला नियमितपणे दूध पुरवठा करणे बंधनकारक असतांनाही राज्यातील १०५ पैकी तब्बल ७६ दूध संघांनी महानंदाला नियमितपणे दूध पुरवठा केला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दूध संघाकडून दूध पुरवठा होत नसल्याने महानंदला बाजारातून जादा दराने दूध खरेदी करावे लागत असल्याने महानंदला गेल्या एका वर्षातच ५४ कोटी रूपयांचा तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या दूध संघानी महानंदला दूधाचा पुरवठा केला नाही त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे,

(४) अद्याप याबाबत दूध संघावर कोणतीच कारवाई केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) महासंघास दूध पुरवठा करणा-या सदस्यसंघाना नियमितपणे दूध पुरवठा करण्याबाबत महासंघामार्फत दि. १९/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये निदेश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने १५ सदस्य संघांकडून खुलासे प्राप्त झाले असून उर्वरितांकडून अद्यापि खुलासे प्राप्त झाले नाहीत.

-----------------

## अवकाळी पाऊस आणि गारपीटग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई अद्यात मिळालेली नसल्याबाबत

**(३८) * ७१५६ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अलिबाग, तळा, म्हसळा, माणगांव, खालापूर, श्रीवर्धन, मुरुड, सुधागड या तालुक्यात दिनांक ३०.९.२०१४ रोजी तसेच माहे ऑक्टोबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात परतीच्या पावसामुळे शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) ढगाळ वातावरण असल्याने शेतकरी चिंतेच असतांना दिनांक १ व २ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, काजू, बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) मौजे गुगळगाव, (ता.उमरगा, जि. उस्मानाबाद ) येथील गारपीटग्रस्त नागरीकांना नुकसान भरपाई मिळणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(४) नांदेड जिल्हयातील देगलूर बिलोली व मुखेड तसेच किनवट या तालुक्यामध्ये सन २०१४ च्या रब्बी हंगामामध्ये मोठया प्रमाणावर गारपीठ होऊन शेतातील उभ्या पिकांचे, फळांचे व घराचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते, अशा नुकसानग्रस्तांना शासकीय मदत करण्याच्या उदेशाने नुकसानग्रस्त शेती, पिके व घरांचे सर्वक्षण करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली काय,

(६) असल्यास, चौकशीअंती सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत तात्काळ मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही,
(२) नाही,
(३) होय,
(४) होय,
(५) होय,
(६) व (७) मौ.गुगळगाव (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील ४८० बाधित शेतक-यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील फेब्रुवारी व मार्च २०१४ मध्ये ५० टक्के पेक्षा जास्त बाधित झालेल्या ६६२९९.१८ हे क्षेत्रातील १३३९८६ शेतक-यांच्या बँक खात्यात ७४.५३ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.

-----------------

**अकोला कृषी विदयापीठातील ८३ अधिकारी, कर्मचाऱ्यांना नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(३९) * ८२१२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.संजय कुटे (जळगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या वणीरंभापूर येथे २००७ पासून काम करणाऱ्या अस्थायी कर्मचाऱ्यांना तीन महिन्यांपासून काढून टाकण्यात आले असून व त्यांना कामावर परत घेण्यासाठी त्या कर्मचाऱ्यांनी १० दिवसांपासून धरणे आंदोलन सुरु केले असल्याचे जानेवारी,२०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला कृषी विदयापीठातील ८३ अधिकारी, कर्मचाऱ्यांना नोकरीत सामावून घेण्यासाठी सुरु असलेल्या आंदोलनानंतर कुलसचिवांनी शिष्टमंडळाला १ फेब्रुवारी २०१५ पर्यंत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आश्वासनानुसार या ८३ अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोकरीत सामावून घेण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) नाही, विद्यापीठाद्वारे पदभरती संबंधी सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत शिष्टमंडळास अवगत करण्यात आले आहे.
(३) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना वरिष्ठ व कनिष्ठ संशोधन सहाय्यकांची भरती प्रक्रिया लवकर करण्याबाबत सुचना देण्यात आल्या असून वरिष्ठ व

संशोधन सहाय्यकांची भरती प्रक्रियाबाबतची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर प्राधान्याने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात माहे जानेवारी, २०१५ मध्ये उधाणामुळे खारेपाणी शेतात घुसल्यामुळे झालेले नुकसान

**(४०) * ६१७८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यामध्ये दिनांक २० व २१ जानेवारी, २०१५ रोजी समुद्राला आलेल्या उधाणामुळे खाडीपट्ट्यातील गावांमध्ये खाडीची पातळी ओलांडून खारे पाणी शेतात घुसले, हे खरे आहे काय,

(२) खाडीपट्ट्यातील गोवळ, शिवणे, विलये, पडवे, धाउलवल्ली, अणसुरे, पारवाडी यांसह परिसरातील ५० ते ६० गावांमध्ये खारे पाणी शेतजमिनीत शिरल्याने उन्हाळी शेती करणा-या शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) खारे पाणी शिरल्यामुळे केवळ हाती आलेले पिकच नव्हेतर पुढील काही वर्षे या जमिनीत शेतक-यांना पीक घेता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) ठुकरुलवाडी, अणसुरे, कुंभवडे, खालचीवाडी व गोवळ येथे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

(३) यासंदर्भात खारभूमी विभाग, कृषि विद्यापीठ व कृषि विभाग यांच्या संयुक्त पाहणीनंतर निष्कर्ष काढणे शक्य होईल.

(४) नुकसान झालेल्या गावातील संयुक्त पंचनामे करण्यात आले असून, त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील लोहगड, तुंग, तिकोना किल्ला आणि पवना धरण परिसरातील टेकड्यांची बेकायदेशीर फोड होत असल्याबाबत**

**(४१) * १२१९२ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील लोहगड, तुंग, तिकोना किल्ला आणि पवना धरण परिसरातील टेकड्या फोडून परवान्यांतील नियम व अटी न पाळता नियमबाह्य पध्दतीने जमिनीचे सपाटीकरण करून त्या जमिनीवर बंगल्याची बांधकामे जोरात सुरू आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**पुणे जिल्हा परिषदेच्या अनेक शाळेतील विद्युत पूरवठा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान**

**(४२) * ६२८० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांना वीज बिले थकल्यामुळे महावितरण कंपनीने शाळेमधील वीज जाडणी बंद करून वीज मीटर काढून नेल्यामुळे प्रजासत्ताक दिनाला दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी जिल्हयातील सुमारे ७०० शाळांमधील विद्युत पूरवठा बंद होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील अनेक शाळांना वीजेवरील संगणक लॅब, प्रोजेक्टर, ई-लर्निंग, स्मार्ट कार्ड, पाणी शुध्दीकरण यंत्र अशा वीजेवर चालणा-या सुविधा दिलेल्या असताना वीजेअभावी शैक्षणिक उपकरणे बंद पडून ती खराब होऊ लागली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाकडे वीज बिल अनुदान थेट शाळांना देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाने करूनही वीज बिलापोटी कुठलेही अनुदान शाळांना उपलब्ध करून दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळांना व्यावसायिक दराने विज बिल आकारण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांना घरगुती दराने वीजबिल आकारण्याबाबत व विज बिल अनुदान थेट शाळांना मिळण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

दिनांक २६.१.२०१५ पर्यंत पुणे जिल्ह्यांतर्गत एकूण ११ जिल्हा परिषद शाळांच्या वीज जोडण्या थकबाकीसाठी खंडित करण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) जिल्हा परिषद शाळांच्या सार्वजनिक सेवा या वर्गवारीच्या दराने वीज पुरवठा करण्यात येतो.

-----------------

**खडखड धरणग्रस्तांना प्राथमिक सोई-सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(४३) * ९०४५ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार तालुक्यातील खडखड धरणाच्या कामासाठी खडखड गावातील २०० कुटूंबाचे कासरवाडी ग्रामपंचायत हद्दीत ६ वर्षापूर्वी पुनर्वसन होऊनही अद्यापपर्यंत सदरहू गावास रस्ते, वीज, पाणी, शिक्षण व आरोग्य इत्यादी प्राथमिक सोई-सुविधा उपलब्ध करून न दिल्याची बाब स्थानिक प्रकल्पग्रस्त, ग्रामपंचायत सदस्य व आदिवासी युवा संघटना अध्यक्ष यांनी उपोषणाद्वारे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ग्रामस्थांना गावाच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अपु-या राहिलेल्या विविध सोई-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अशंतः खरे आहे.

खडखड धरणामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांना प्राथमिक सोई-सुविधा मिळण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य श्री.सुनिल घाटाळ व इतर स्थानिक प्रकल्पग्रस्त यांनी उपोषण केले होते. तथापि, मौजे खडखड व खडखड अंतर्गत धापडपाडा येथील ३५ धरणग्रस्तांनी मौजे कासटवाडी येथे स्वतः घरे बांधून वस्ती केली आहे.

(२) सदर पुनर्वसित गावामध्ये शाळ, पिण्याचे पाणी या सुविधा पुरविण्यात आलेल्या असून उर्वरित नागरी सुविधा पुरविण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना जिल्ह्यात महावितरणकडून मिटर रिडींग न घेता जादाची विदुत देयके दिल्याबाबत**

**(४४) * ११५३५ श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात महावितरणाकडून मिटर रिडींग न घेता जादाची विदुत देयके दिल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार फोटोसह मिटर रिडिंगची अंदाजे बिले देणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विविध ठिकाणी अवैध रेती उपसा होत असल्याबाबत**

**(४५) * ६६५३ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदीच्या पात्रात, फुलंब्री तालुक्यातील (जि.जालना) गिरीचा नदीचे पात्रात तसेच डोंबिवली ते कल्याण गट नं.९ परिसरातील खाडी किनारी अवैध रेती उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) मालेगांव (जि.नाशिक) येथे अवैध रेती उपसा होत असूनही त्याकडे संबंधित अधिकारी दूर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध रेती उपसा करणे व साठा करण्यास शासनाच्या जागेचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिका-यांना वारंवार निवेदने देवूनही अवैध रेती उपसा थांबविण्यात येत नसल्याने शासनाचा महसुल बुडत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रेती उपसा करणा-यांवर व त्यांना सहाय्य

करणा-या संबंधीत अधिका-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी रायगड, ठाणे व औरंगाबाद जिल्हयात गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांनी केलेल्या तपासणीत अवैध उत्खननाची काही प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे,
(२) अवैध रेती उपशाकडे अधिका-यांनी दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आली नाही,
(३) प्रश्नाधीन ठिकाणांपैकी कल्याण तालुक्यात खाडीकिनारी अवैध वाळूचा साठा होत असल्याची बाब निदर्शनास आली असून उप विभागीय अधिकारी कल्याण यांनी याबाबत कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास कळविले आहे,
(४), (५) व (६) रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यात सन २०१४-२०१५ या वर्षात गौण खनिजाचा अवैध उत्खनन/वाहतूकीच्या ११९ प्रकरणात रुपये १६,०९,६७८/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, ४ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,

औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यातील गिरीजा नदीपात्रातील अवैध वाळू उपशाच्या प्रकरणात जानेवारी, २०१५ मध्ये रुपये ९१,७८०/- इतका दंड वसुल करण्यात आला असुन, २ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यात सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीच्या ४३१ प्रकरणात रुपये १,२५,७८,५५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

नाशिक जिल्हयातील मालेगांव तालुक्यात सन २०१४-२०१५ या वर्षात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ४३५ प्रकरणात रुपये २९.०१ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला असुन, ६ प्रकरणामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील तळा व म्हसळा तालुक्यातील शेतक-यांची फसवणूक करुन बेकायदेशीर जमीन खरेदी केल्याबाबत**

**(४६) * १०६१९ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील तळा व म्हसळा तालुक्यातील शेतक-यांची विरेश छाब्रा डायरेक्टर बॉम्बे मरीन इंजिनिअर वर्क्स यांनी फसवणूक व दिशाभूल करुन बेकायदेशीर जमीन खरेदी केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात प्रमोद घोसाळकर, यांनी मा.जिल्हाधिकारी, रायगड व तहसिलदार तळा व म्हसळा यांना दिनांक २६ डिसेंबर, २०१३ रोजी पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार दोषी असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यात महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या तरतुदीचा विचार करता श्री. विरेश छाब्रा या व्यक्तीने सुमारे १-२३-५ हे आर अतिरिक्त वरकस क्षेत्र धारण केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे तसेच बॉम्बे मरीन इंजीनिअर वर्क्स प्रा.लि.तर्फे संचालक श्री. विरेश छाब्रा यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ६३ अन्वये आवश्यक परवानगी न घेता म्हसळा तालुक्यात जमीन खरेदी केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.
(२) व (३) श्री. प्रमोद घोसाळकर यांनी डिसेंबर २०१३ मध्ये दिलेल्या पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने तहसिलदार म्हसळा व तळा यांनी प्राथमिक चौकशी केली असून सदर प्रकरणी तहसिलदार यांचे स्तरावरुन महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ च्या कलम ६३ मधील तरतुदीचा भंग झाल्याविषयी कलम ८४ क नुसार चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच श्री. विरेश छाब्रा यांच्याकडील अतिरिक्त क्षेत्राबाबत उपविभागीय अधिकारी माणगाव यांचेकडून महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिकलसेल रुग्णांना राज्य परिवहन मंडळाच्या बसमधून**
**मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) * ८७३१ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या मोफत प्रवासाचा लाभापासून सिकलसेलग्रस्त रुग्णांना वंचित रहावे लागत असल्याबाबतचे वृत्त दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सन २०१४-१५ मध्ये १५.११ कोटींच्या रुपयांची तरतूद केली परंतु प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ही रक्कम एस.टी. महामंडळाकडे वळती न केल्यामुळे सिकलसेलग्रस्त रुग्णांना मोफत प्रवासाच्या लाभापासुन वंचीत रहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर माहिती माहितीच्या अधिकार अंतर्गत मागितली असता शासनाने सन २०१४-१५ मध्ये १५.११ कोटी रुपयांची तरतुद केली असून आदिवासी विभागाला १२.५६ कोटी, सामाजिक न्याय विभागाला १.८८ कोटी आणि सार्वजनिक आरोग्य विभागाला ०.६६ कोटी रुपये

दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निधी हा एस.टी. महामंडळाकडे वळता करण्यास विलंब करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**राज्याला वीज पुरवठा करणा-या महावितरण कंपनीची विविध विभागाकडून थकबाकी वाढत असल्याबाबत**

**(४८) * ८०८० श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला वीज पुरवठा करणा-या महावितरण कंपनीची उद्योजक, शेतकरी, पाणी पुरवठा संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी वीज देयक भरले नसल्यामुळे थकबाकीच्या आकडा २० हजार कोटींवर गेला असल्याची बाब दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने ही थकबाकी वसुल करण्याबाबत विजधारकावर काय कार्यवाही करण्यात येत आहे, वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय
(२) महावितरण कंपनीची एकूण थकबाकी २००८१ कोटी असून त्यापैकी अद्योजक, शेतकरी पाणी पुरवठा संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या चालू (Live) ग्राहकाची थकबाकी रु.१३०६० कोटी एवढी असल्याचे आढळून आले असून थकबाकी वसुली करण्याकरिता महावितरण कंपनीतर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) थकबाकी वसुली करण्याकरिता महावितरण कंपनीतर्फे वेळोवेळी वीज पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही नियमितपणे करण्यात येते. परंतु काही कारणास्तव महावितरण कंपनीला कृषी ग्राहकांवर व स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत पाणी पुरवठा व दिवाबत्ती ग्रहकांवर विद्युत पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही काटेकोरपणे करणे शक्य होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**रायगड जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघाला मागील सहा महिने बोटीचे प्रमाणपत्र मिळाले नसल्याबाबत**

**(४९) * ८१६९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघाला मागील सहा महिने बोटीचे प्रमाणपत्र मिळाले नसल्यामुळे मच्छिमारांचे मोठयाप्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित खात्याकडून मच्छिमार नौकांचे व्ही.आर.सी देण्याचे बंद करण्यात आले असल्याने नविन तयार केलेल्या मासेमारी नौका तसेच हस्तांतरीत केलेल्या मासेमारी नौका मच्छिमारीकरीता समुद्रात जाऊ शकत नाही, ही गोष्ट खरी आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ संदर्भात मच्छिमारांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ व नियम १९८२ मध्ये आवश्यक बदल करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु असून मच्छिमारांना अडचण येऊ नये म्हणून मासेमारी नौका नोंदणीचे प्रस्ताव स्विकारण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**डोंबिवलीच्या दावडी गावातील (ता.कल्याण, जि.ठाणे) जमिनींच्या नोंदीचे रेकॉर्डचे चोरीला गेल्याबाबत**

**(५०) * ९३८६ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यातील (जि.ठाणे) डोंबिवलीच्या दावडी गावातील गोविंद पांडू पाटील व मारुती पांडू पाटील यांचे निधन झाल्यनंतर त्याची सुमारे २०० कोटी रुपयांची जमीन बिल्डर व काही बोगस व्यक्तींच्या नांवे करण्यासाठी तलाठ्यांची बनावट नोंदी केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट नोंदी करण्याचा प्रकार उघडकीस येताच दावडीसह चार गावातील जमिनींच्या नोंदीचे रेकॉर्ड चोरीला गेल्याचे तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दाखवून त्याबाबत पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) तलाठी कार्यालय, सजा दावडी कार्यालयात दिनांक ११.१२.२००९ रोजी सरकारी दस्तऐवज चोरी करुन नेलेबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे गुरनं. ४२१ / २००९ भादंविसं कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दिनांक १२.१२.२००९ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर प्रकरणी न्यायालयाने दिनांक २२.०२.२०१२ रोजी सदर गुन्ह्याची अ वर्गात समरी मंजुर केलेली आहे.
महसूल विभागाने चौकशी करुन सदर जमिन शासन जमा केलेली आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, नेवासा, कर्जत व जामखेड तालुक्याती ल जमिन तेथील खाजगी सावकारांनी बळकावली असल्याबाबत**

**(५१) * ६०३२ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (सहकार) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, नेवासा, कर्जत व जामखेड तालुक्यातील सुमारे २०० एकरहून अधिक जमिन तेथील खाजगी सावकारांनी बळकावली असून त्या जमिनी परत मिळण्याबाबत व सावकारांविरुध्द कारवाई करावी या मागणीसाठी तेथील शेतक-यानी मुंबईतील आझाद मैदानावर दिनांक १० जानेवारी, २०१५ पासून धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील सर्व शेतकरी अल्पभूधारक असून अनेक शेतक-यांनी त्यांच्या कर्जाची परतफेड केली असताना सुध्दा सावकाराने त्याच्या जमिनी परत दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‍नुसार संबंधित सावकारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय. श्री. रावसाहेब भागुजी गाजरे अध्यक्ष शेतकरी बचत गट पिंपळनेर जि. अहमदनगर यांनी दि. ८.०१.२०१५ पासून खाजगी सावकारांनी शेतक-यांच्या हडप केलेल्या शेतजमिनी परत करावे व इतर मागणीकरीता आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण कार्यक्रम आयोजित केला होता.
(२), (३) व (४) नगर जिल्ह्यातील सावकारी विरोधात शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी

आवश्यक त्या कार्यवाही करीता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे व जिल्हा उपनिबंधक, नगर यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत. पारनेर तालुक्यामध्ये बेकायदेशीर सावकारी बाबत ७ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारीबाबत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार सकृत दर्शनी सर्वश्री भागचंद साकला, माधव ढुमणे हिरालाल पगारीया व चांदमल चोपडा हे बेकायदेशीर सावकारी करतात असे दिसून आल्याने त्यांच्या विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नेवासा तालुक्यामध्ये एकूण ४ तक्रारी प्राप्त झालेल्या असून त्याबाबतही कार्यवाही करण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात एकूण १६ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ७ तक्रारीवर कार्यवाही करुन तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरीत तक्रारीबाबत अंतिम कार्यवाही करुन तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरीत तक्रारीबाबत अंतिम कार्यवाही सुरु आहे. जामखेड तालुक्यात अशा प्रकारची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांना करावयाच्या खत पूराव्यातील गैरप्रकार

**(५२) * ९३३० डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांना प्रत्यक्ष खते न देता खते दिल्याच्या खोट्या नोंदी तयार करुन शासनाकडून अनुदान लाटण्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने संबंधितांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार पुढे संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबोली (जि.सिंधुदुर्ग) बस स्थानकात सोयी - सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५३) * ८००४ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली पर्यटन केंद्रासाठी महत्वपूर्ण असणारे आंबोली बसस्थानक अनेक समस्यांच्या विळख्यात असून अनेक सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २४ लाख खर्चून बांधण्यात आलेल्या बसस्थानकावर तेवढ्या प्रमाणात सुविधाच पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बसस्थानकास अनेक सोयी-सुविधांचा अभाव असतांनाही सदर बसस्थानक सुरु करण्यास परवानगी कोणत्या निकषानुसार देण्यात आली आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

आंबोली बसस्थानकाची पुनर्बांधणी रु. १५,४४,५८०.७८ इतका खर्च करुन करण्यात आली आहे. ६०x२० फूट आकाराचे बसस्थानक इमारत असून बसस्थानकात सकाळी ८ ते ५ या वेळेत वाहतूक नियंत्रकाची नेमणूक केली आहे. प्रवाशांसाठी प्रतिक्षालय, उपहारगृह, पिण्याच्या पाण्याची सोय, इ. सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत तसेच प्रसाधनगृहाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(३) आंबोली बसस्थानक जानेवारी, २०१४ पासून कार्यान्वित करण्यात आले असून प्रवाशी वाहतूक सुरु आहे. तसेच बसस्थानकात प्रवाशांना देय असलेल्या सर्व सोयीसुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेच्या जवळपास सर्वच शाळांची वीज जोडणी तोडली असल्याबाबत

**(५४) * ६०७२ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या जवळपास सर्वच शाळा संगणकयुक्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणकयुक्त झालेल्या शाळांना यापूर्वी व्यावसायिक दराने वीज बिल आकारणी केली जात होती. परंतु आता सार्वजनिक सेवा दराने वीज बिल आकारणी केली जात आहे परंतु व्यावसायिक दर व सार्वजनिक सेवा दारात फारशी तफावत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ब-याच शाळांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे व वीज बिल ५०० रुपयांपेक्षा जास्त येत असल्यामुळे शाळा वीज बिल भरु शकत नाही त्यामुळे शाळेची वीज जोडणी तोडली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदर शाळासाठी वीज बिल घरगुती दराने मिळावी अशी मागणी आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाने दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडे व तेथील लोप्रतिनिधींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) अंशतः खरे आहे.
(३) जिल्हापरिषद शाळांनी वीज बिल थकबाकी न भरल्यास नियामाप्रमाणे वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात येतो.
(४) नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

### खामगाव जि.बुलढाणा येथे महाराणा केबल नेटवर्कचे अवैध कनेक्शन बंद करणेबाबत

**(५५)** * *८४८५* **श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव परिसरात महाराणा केबल नेटवर्कचे प्रचंड जाळे पसरले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वास्तविक केबल कनेक्शन जास्त असून सुध्दा शासनाकडे कमी कनेक्शन दाखवून शासनाच्या मनोरंजन कर भरण्यामध्ये फसवणूक करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराणा केबल नेटवर्क शासनाचा करमणूक कर बुडवित असल्याबाबत त्यांच्यावर कर बुडवणूक व शासनाची फसवणूक केल्याबद्दल संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करून बुडविलेला करमणूक कर वसुली करण्यासंबंधी ॲड.आकाश फुंडकर, वि.स.स. खामगाव यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१२ रोजी मा.मंत्री, महसुल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाची फसवणूक करणा-या व कर बुडविणा-या महाराणा केबल नेटवर्कच्या संचालकांवर शासन कडक कारवाई करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, महाराणा केबल नेटवर्क या कंपनीने खामगांव शहरामध्ये तसेच ग्रामीण क्षेत्रामध्ये अनेक केबल जोडण्या दिलेल्या आहेत.

(२) महाराणा केबल नेटवर्क या कंपनीच्या केबल सेवेसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये या केबल आयोजकाने शहरी भागामध्ये दिलेल्या घोषित जोडण्यांपेक्षा १५५० अतिरिक्त जोडण्या आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे खामगांव तालुक्यातील ग्रामीण भागातील सदर केबल आयोजकाकडे असलेल्या केबल सेवेचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु आहे.
(३), (४) व (५) मा.मंत्री (महसूल) यांच्या कार्यालयातील अभिलेखामध्ये तपासणी केली असता अशा प्रकारे पत्र आढळून आले नाही. तथापि, घोषित केबल जोडण्यांपेक्षा अतिरिक्त आढळून आलेल्या केबल जोडण्यासंदर्भात महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या तरतुदीनुसार संबंधित केबल चालकाविरुध्द जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

-----------------

**परभणी जिल्हयातील १३३ गावांना राज्य परिवहन महामंडळाची**
**बस सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५६) * ११००३ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील ९ तालुक्यांमध्ये असलेल्या ८३१ गावांपैकी १३३ गावांना एस.टी.बस सेवा उपलब्ध नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांना एस.टी.बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तसेच आजारी रूग्णांना जिल्हयाच्या ठिकाणी रूग्णालयांत जाण्याकरिता गैरसोयीचे होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार उपरोक्त गावांना तात्काळ एस.टी.बस सेवा उपलब्ध करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
वरील १३३ गावांपैकी बहुतांश गावे ही ३ कि.मी. च्या परिघात असून एस.टी.च्या थाब्यांद्वारे गावांच्या नजीकच्या फाट्यापर्यंत जोडलेली आहेत. तसेच वरील गावांना फाट्यापासून गावांपर्यंतच्या थांब्यापर्यंत रस्ता योग्य नसल्याने फाट्यापर्यंत बस सेवा सुरु आहे.
(३) सदर गावांना बस सेवा सुरु करण्याबाबत प्रवाशांकडून मागणी प्राप्त झालेली नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्ते वाहतुकीस अयोग्य असल्यामुळे बस सेवा सुरु करणे शक्य होत नाही.

(४) जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील सदर रस्ते वाहतुकीयोग्य झाल्यास रस्त्याची पाहणी करुन बस सेवा सुरु करण्याबाबत विचार करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शहापूर तालुक्यात (जि.ठाणे) माहुली किल्ला परिसरात अभयारण्य क्षेत्रात अवैधरित्या दगडखाण सुरु असल्याबाबत**

**(५७) * ८४३२ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यात (जि.ठाणे) माहुली किल्ला परिसरात अभयारण्य क्षेत्रात अवैधरित्या दगडखाण सुरु असून क्रशर मशिनद्वारे दगड फोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खाणीतील स्फोटाच्या मोठया आवाजामुळे तेथील नागरिकांच्या घरांचे नुकसान होत असून त्याची धूळ उडत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अवैध दगडखाणी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) शहापूर तालुक्यातील माहुली किल्ला परिसरात अभयारण्य क्षेत्रात दगडखाण नसून, मौजे आवाळे, ता. शहापूर येथे खाजगी गट नंबर १९६ जमीनीवर जून २०१० मध्ये ५ वर्ष कालावधीसाठी खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे. सदर खाणपट्टयातील उत्खनन केलेला दगड क्रशरद्वारे फोडण्यात येत आहे. सदरचा खाणपट्टा माहुली गावापासून ५०० मीटर अंतरावर असून पाहणीत खाणपट्टयातील स्फोटाच्या मोठ्या आवाजामुळे नागरीकांच्या घरांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

सदर खाणकामामुळे प्रदूषण होणार नाही यांची नियमानुसार दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित खाणपट्टाधारकांना देण्याबाबत जिल्हाधिका-यांना सुचित करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयातील शेतक-यांना बनावट बियाणे पूरविणा-या व्यापा-यावर कारवाई करण्याबाबत**

**(५८) * ९२७८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णानगर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील शेतक-यांना बनावट बियाणे देण्यात येवून शेतक-यांची फसवणूक करण्यात आलेल्या प्रकरणाची चौकशी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट बियाणांची विक्री करणा-या व्यापा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथराव खडसे :** (१) पूर्णानगर, ता.भातकुली, जि.अमरावती येथील शेतक-यांना बोगस बियाणे देवून त्यांची फसवणूक करण्यात येत असल्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी दि.०७/०१/२०१५ रोजी जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन दिलेले होते.

(२) सोयाबीन बियाणे उगवणीबाबत २२ शेतक-यांच्या तक्रारी तालुका स्तरावरील तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या होत्या. तपासणीत सदर २२ शेतक-यांच्या तक्रारीतील बियाणे सदोष असल्याचे निदर्शनास आले. २२ पैकी १४ प्रकरणात संबंधीत कंपन्यांनी शेतक-यांना बियाणे मोबदला दिलेला असून ८ प्रकरणात कंपन्यांकडे पाठपुरावा सुरु आहे. पूर्णानगर येथील २ कृषि केंद्राचे परवाने कायम स्वरुपी रद्द करण्यात आलेले असून कु-हा येथील २ कृषि केंद्राचे परवाने ६ महिन्यांकरीता निलंबीत करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट अभयारण्यातील पुनर्वसीत झालेल्या शेतक-यांना शेतीची मालकी देण्यात आली नसल्यामुळे कृषी विभागाच्या योजनांपासून वंचीत रहावे लागत असणे

**(५९) * १२७८४ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) येथील व्याघ्र प्रकल्पामुळे मेळघाट अभयारण्यामधुन आकोट तालुक्यातील पुनर्वसीत झालेल्या कोहा, कुड, बोरी या गावातील आदिवासी शेतक-यांना गत १४ वर्षापासून अद्यापही शेतीची मालकी देण्यात आली नाही त्यामळे त्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांपासून वंचित रहावे लगत आहे, या गंभीर प्रकाराकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आदिवासी शेतक-यांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावाचे अमरावती जिल्ह्यातून कोहा, कुंड, बोरी, आकोट तालुका (जि.अकोला) येथे सन २००१-२००२ मध्ये पुनर्वसन होवून शेकडो आदिवासी कुंटूंबांनी आपली मालकीणी जमीन व्याघ्र प्रकल्पाला दिली परंतु त्यांना अद्यापही घराव्यतीरिक्त फक्त भोगवटदार वर्ग-२ म्हणून वा शेती करीता जमीन देण्यात आली व मात्र या जमीनीची मालकी शासनाकडे करीता जमीन देण्यात आली व मात्र या जमीनीची मालकी शासनाकडे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप पावेतो आदिवासी शेतक-यांनी व्याघ्र प्रकल्प करीता जमीनी

दिल्यानंतर उक्त प्रकरणी शासना मार्फत चौकशी केली काय,
(४) चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर दिरंगाईस जबाबदार असणा-या अधिका-या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## मुंबई शहरातील भांडूप (प.) मुंबई उपनगर येथे रॉयल्टी न भरता ४ हजार डंपरचा मातीचा भराव टाकण्यात आल्याबाबत

**(६०) * ६५२० श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील भांडूप (प.) मुंबई उपनगर येथिल सेंट झेवियर्स शाळेच्या मागे असलेल्या भूखंडावर दिनांक १ ऑक्टोबर, २०१४ ते २७ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत रॉयल्टी न भरता ४ हजार डंपरचा मातीचा भराव टाकण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भराव टाकल्यामुळे नाल्याची उंची कमी होऊन नाल्यातील पाण्याचा निचरा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नाल्यात पाणी साठून राहिल्यामुळे परिसरातील लोकांना दुर्गंधी व डासांचा त्रास व संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचा भराव टाकतांना रॉयल्टी बुडविण्यात आल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात आली, आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कांजूर, ता. कुर्ला येथील सर्वे नंबर ६२ येथील काही जमीनीवर १३५६ ब्रास मातीचा विनापरवाना भराव केल्याचे ऑक्टोबर २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे. सदर जागा भारतीय नौसेनेच्या ताब्यात असुन, विनापरवाना माती भरावाच्या अनुषंगाने संबंधिताविरुध्द रुपये ४८,७६,१७६/- इतकी दंडनिय रक्कम आकारण्याचे आदेश तहसिलदार कुर्ला यांच्याकडून पारित करण्यात आले आहेत.

सदर ठिकाणी मंडळ अधिकारी घाटकोपर यांनी दिनांक २६/०२/२०१५ रोजी पाहणी केली असता नाल्यातील पाण्याचा निचरा होत असल्याचे व पाणी साठून राहिलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

-----------------

**ठाणे जिल्ह्याच्या महसूल विभागाने गेल्या वर्षभरात बेकायदा रेती उपसा करणा-यांवर केलेली कार्यवाही**

**(६१) * ११८०८ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याच्या महसूल विभागाने गेल्या वर्षभरात बेकायदा रेती उपसा करणा-यांवर धाड टाकून १८ हजार ब्रास रेती जप्त केली तर ४२ जणांवर गुन्हे दाखल केले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास ३० संक्शन पंप, १५ बोटी, १६ पोकलेन मशीन जप्त केल्या असतानाही खाडी किनाऱ्यावर रेती उपसा सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रेती माफियांवर संबंधित अधिकाऱ्यांनी काय कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ठाणे जिल्ह्यात सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या २ वर्षात २३०७६ ब्रास रेती जप्त करुन, ४३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन/ वाहतूक रोखण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांद्वारे नियमित कारवाई करण्यात येत आहे. सदर पथकांद्वारे माहे जानेवारी २०१५ मध्ये ४ वेळा कारवाई करुन, त्यामध्ये रेतीचे प्लॉट उध्वस्त करणे, रेतीसाठा जप्त करणे व रेती उत्खनन करणा-या बार्ज नष्ट करणे अशा प्रकारची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावतील जिल्हयात विकण्यात आलेले सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याबाबत**

**(६२) * १०२८४ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतील जिल्हयात विक्री करण्यात आलेले विविध कंपनीचे सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याबाबत ४९८ तक्रारी कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बियाणे उगवण न झाल्यामुळे एकूण किती हेक्टर क्षेत्रामधील पिकांचे नुकसान झाले आहे,

(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उगवणशक्ती नसलेले बियाणे विक्री करणा-या कंपनीविरूध्द काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथराव खडसे :** (१) अमरावती जिल्ह्यात खरीप हंगाम २०१४ मध्ये सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याबाबत ४९९ शेतक-यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या, हे खरे आहे.
(२) होय.
(३) चौकशीत ३१५ शेतक-यांच्या सोयाबीन बियाण्यांत दोष आढळून आला. त्यानुषंगाने संबंधीत कंपन्यांना आयुक्त (कृषि) यांच्या स्तरावरुन कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. ३१५ तक्रारींपैकी २४ शेतक-यांना ४५ क्विंटल बियाणे परतावा आणि २१४ शेतक-यांना बियाणे मोबदला रक्कम रुपये २३,८६,५४५/- संबंधीत कंपनीकडून अदा करण्यात आलेली आहे. उर्वरीत शेतक-यांना बियाणे मोबदला देण्याबाबत पाठपुरावा चालू आहे. दोन कृषि केंद्रांचे परवाने कायम स्वरुपी रद्द करण्यात आलेले आहेत, तर २ कृषि केंद्रांचे परवाने सहा महिन्यांकरिता निलंबित करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे निळेमोरे (ता.वसई, जि.पालघर) येथे बेकायदेशीरपणे व गैरप्रकाराने तलाठी व मंडल अधिकारी यांनी अभिलेखात फेरफार केल्याबाबत**

**(६३) * ५३५२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निळेमोरे (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं. २२० पै. या जमिनीबाबतचे फेरफार नं. १४४१ व १२४३ रद्द केल्यानंतर त्या अगोदरच्या फेरफारानुसार अधिकार अभिलेखाची पुर्वस्थिती पुर्नप्रस्थापित न करता तलाठी व मंडल अधिकारी यांनी , बेकायदेशीरपणे व गैरप्रकाराने ८५ गुंठे जमिनीचा ७\ १२ उतारा तयार केला आहे, असे संबंधित शेतक-यांना श्री.पी.वेलरासु, जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी पुराव्यासह निवेदन देऊन त्यांचे निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्व्हे नंबरमधील ५ गुंठे जमिनी व्यतिरीक्त उर्वरित जमिनी कुळांना कुळकायद्याने मिळाल्या असून कुळकायद्याचे आदेश रद्द न करता ५ गुंठे जमिनीत कुळ असलेल्या व्यक्तींची ४३ गुंठे जमिनीत कुळ असल्याची बेकायदेशीर नोंद संबंधित मंडल अधिका-याने प्रमाणित केल्याचे उक्त निवेदनात पुराव्यासह जिल्हाधिकारी ठाणे यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी मोठ्या प्रमाणात भ्रष्ट्राचार झाल्यामुळे ८५ गुंठे जमिनीचा बेकायदेशीर ७/१२ उतारा तयार करुन ४३ गुंठे जमिनीसाठी कुळाचे नावाची केलेली नोंद रद्द करणे व सदर बेकायदेशीर नोंद करणारे तलाठी व मंडल अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशा स्वरुपाची तक्रार जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दि. ०२.०५.२०१३ च्या निवेदनान्वये प्राप्त झाली आहे.

(३) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी आदेश दिनांक १४.०२.२०११ अन्वये फेरफार नं. १४४१ व १२४३ रद्द केले असून सदर आदेश मा. मंत्री (महसूल) यांच्या दिनांक २५.०९.२०१२ च्या आदेशान्वये कायम करण्यात आल्याने तदनुसार संबधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून अधिकार अभिलेखाची पुर्वस्थिती पुनःप्रस्थापित करण्यात आली असल्याने सदर कर्मचा-यांविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता नेमलेल्या डॉ.नरेंद्र दाभोलकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६४) * ५७९३ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाडा व विदर्भात मागील एक महिन्यात शेतक-यांनी दुष्काळाला व कर्जबाजारीपणा ,पावसाचा अनियमितपणा, गारपीट, अवकाळी पाऊस, सावकाराचे कर्ज, दलालाचे कमिशन, व्यापाराची पिळवणूक यामुळे शेतकऱ्यांनी कंटाळून विष पिऊन तसेच गळफास घेऊनही आत्महत्या करण्यात आल्या असून दररोज तीन ते पाच शेतकरी दुष्काळ व कर्जाला कंटाळून आत्महत्या करित असूनही प्रतिबंधात्मक अशी उपाययोजना करण्यात येत नसल्याचा अनुभव येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने नेमलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी अद्यापही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषनेनुसार पॅकेज मधून किती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(४) असल्यास, दिवसें दिवस वाढत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी

लवकारात लवकर आर्थिक पॅकजची तरतूद करण्याबाबत तसेच डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) माहे जानेवारी, २०१५ मध्ये नागपूर विभागात २८, अमरावती विभागात ७८ व औरंगाबाद विभागात ५६ शेतकरी आत्महत्या निदर्शनास आल्या आहेत. तसेच आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(२) डॉ. नरेंद्र जाधव समितीने सुचविलेल्या १३ शिफारशींच्या बाबतीतील कार्यपुर्ती अहवालास मान्यता देण्यात आली आहे. तसेच अंमलबजावणी संदर्भात शिफारशीनुसार समित्या स्थापन करुन आवश्यक कार्यवाही संबंधित विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) व (४) बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासन निर्णय दि. ०७.०१.२०१५ व दि. ०२.०२.२०१५ अन्वये एकूण रु. ४०००/- कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत संबंधीत विभागामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलाठी सजा खारबांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) अंतर्गत मौजे पाचगांव येथे अनाधिकृत भराव टाकून शासनाचा महसूल बुडविल्याबाबत

**(६५) * १२३५१ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलाठी सजा खारबांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) अंतर्गत मौजे पाचगाव येथील सर्व्हे नं.१५, १६, १७, १८, १९ व २५४ मधील एक एकर अशा एकूण १३ एकर जागेमध्ये अनाधिकृत भराव टाकलेला असल्याचे माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेत ५० हजार ब्रास मातीचा वापर करून मातीची रॉयल्टी रू.१ कोटी शासनाचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खारबांव सजाचे तलाठी श्री.धात्रक, मंडळ अधिकारी श्री.कमलाकर पाटील, रेतीगट शाखेचे भरारी पथक अधिकारी, सध्या खारबांबचे मंडळ अधिकारी श्री.महेश चौकशी यांच्या सहाय्याने शासनाचा महसूल बुडवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सर्व संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सदर अनधिकृत भराव नोव्हेंबर- डिसेंबर, २०१४ मध्ये झालेला नसून, २०१२ मध्ये झालेला आहे.

(२) सदर जागेत ५० हजार ब्रास मातीचा वापर झालेला नसून, ४५०० ब्रास मातीचा भराव केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) असे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्नाधीन प्रकरणी विनापरवाना माती भरावाबाबत संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाई करुन रुपये ६३ लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे. दंडात्मक रक्कम भरणा न केल्याने संबंधितांच्या गाव नमुना नंबर ७/१२ वर बोजा ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राज्यातील औद्योगिक विजेची सबसिडी सरकारने काढल्याबाबत**

**(६६) * ५७५० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक विजेची सबसिडी सरकारने नोव्हेंबर, २०१४ पासून काढल्याने विजेचे दर युनिटला साडेनऊ रुपये इतके झाल्यामुळे विदर्भातील स्टील कंपन्यांनी आपले उद्योग गुंडाळून शेजारच्या मध्य प्रदेश किंवा छत्तीसगड राज्यात जाण्याच्या तयारीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास उजेडात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील १०० स्टील उद्योगांपैकी निम्मे उद्योग बंद पडले असून २० टक्के उद्योग २० टक्के क्षमतेने  चालू आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेजारील राज्यांमध्ये औद्योगिक विजेचे दर पाच रुपयांपेक्षा कमी आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने उद्योग धंदे विजेचे दर वाढल्याने बंद करुन शेजारील राज्यात जाऊ नये याकरीता औद्योगिक विजेला सबसिडी सुरु करुन विजेचे दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नोव्हेंबर २०१४ ला बंद करण्यात आलेली सबसिडी डिसेंबर २०१४ साठी औद्योगिक ग्राहकासाठी पुन्हा सुरु ठेवली. तसेच एप्रिल २०१५ पासून होणा-या प्रस्तावित वीज दर वाढीच्या प्रस्तावित वीज दर वाढीच्या प्रस्तावामध्ये औद्योगिक ग्राहकांचे वीज दर कमी ठेवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सीमा तपासणी नाक्यांवर आर.टी.ओ. अधिका-यांच्या भ्रष्टाचाराबाबत**

**(६७) * १०१३१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २२ सीमा तपासणी नाक्यांवर आर.टी.ओ. अधिका-यांकडून ओव्हरलोड, कर, परमिट, पासिंग अशा विविध काटेकोर नियमांचा ससेमिरा चुकवण्यासाठी कोटयवधी रूपयांचा भ्रष्टाचार केला जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर.टी.ओ. अधिका-यांच्या संगनमताने वर्षानुवर्षे चाललेल्या या रॅकेटच्या व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यातील २२ सीमा तपासणी नाक्यावरील व्यवहार पारदर्शकता होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही. यासंदर्भात माहे जानेवारी, २०१५ दरम्यान परिवहन अधिका-यांविरुध्द भ्रष्टाचाराबाबत कोणताही गुन्हा नोंद नाही.
(२), (३) व (४) ज्या सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण झालेले आहे तेथे पारदर्शकता आणण्यासाठी सर्व व्यवहार हे संगणकीकरणाद्वारे करुन आणि कमीत कमी मानवी हस्तक्षेप होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुरु केल्या आहेत. सेवापुरवठादाराच्या कामकाजातील त्रुटींबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. उर्वरित सीमा तपासणी नाक्यांच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया चालू आहे. सदर सेवापुरवठादार यांना त्यांच्या कामकाजात सुधारणा करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोहीनुर फुटाणा मिलवर टाकलेल्या धाडीत सुमारे ३ कोटी रूपये**
**किंमतीचे बनावट सोयाबीन बियाणे जप्त केल्याबाबत**

**(६८) * ११४३४ श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती उदगीर (जि.लातूर) येथील कृषी अधिकारी यांनी दिनांक २३ जुलै, २०१४ रोजी कोहीनुर फुटाणा मिलवर टाकलेल्या धाडीत सुमारे ३ कोटी रूपये किंमतीचे बनावट सोयाबीन बियाणे जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी उद्गीर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूर जिल्हयात सन २०१४ मध्ये सोयाबीन बियाणे उगवत नसल्याच्या हजारो तक्रारी तालुक्यातील तक्रार निवारण समितीकडे आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सुमारे २१ कंपन्यांच्या बियाण्यांमध्ये दोष आढळून आला, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या बियाणे कंपन्यांवर तसेच या बियाण्यांचा बेकायदा साठा करणा-यांवर काय कारवाई करण्यात आली आहे,

(६) तसेच या बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना काय नुकसान भरपाई देण्यात आली आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५३/२०१४ अन्वये भारतीय दंड विधान तसेच बियाणे अधिनियम खाली गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(३) होय, लातूर जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ६८४ गावातील २१४४ शेतक-यांनी, ३३ बियाणे कंपन्याच्या सोयाबीन बियाण्याची उगवण न झाल्याच्या तक्रारी तक्रार निवारण समितीकडे केल्या होत्या.

(४) २० कंपन्यांच्या बियाण्यामध्ये दोष आढळून आलेला आहे.

(५) सदर प्रकरणी पोलीसांमार्फत चौकशी होऊन आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) नुकसान झालेल्या १००५ शेतक-यांपैकी ३४४ शेतक-यांना बियाणे उत्पादक कंपन्यानी आर्थिक मदत केलेली आहे. उर्वरीत, ६६१ शेतक-यांना मदत देण्याबाबत संबंधीत बियाणे उत्पादक कंपन्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत व कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**पवनचक्की कंपनीने शासनाच्या लाखो रुपयांच्या अनुदानातून बांधण्यात आलेला बेणापूर (ता.खानापूर, जि.सांगली) येथील मातीनाला बांध फोडल्याबाबत**

**(६९) * ११७५३ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नियम कायद्यांना न जुमानता एका पवनचक्की कंपनीने शासनाच्या लाखो रुपयांच्या अनुदानातून बांधण्यात आलेला बेणापूर (ता.खानापूर, जि.सांगली) येथील मातीनाला बांध फोडल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून या मातीनाला बांधाचे सध्या मोठया सडकेत रुपांतर झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुषंगाने संबधित पवनचक्की कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणाची अद्यापही चौकशी केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाही,
तथापि संबंधित शेतक-याने सदर माती नाला बांधच्या शेजारुन एका पवनचक्की कंपनीस वाट दिली होती त्यामुळे माती नाला बांध एका कडेने खराब झाला होता. त्यानुसार मंडळ कृषि अधिकारी, खानापुर यांनी पहाणी केली असता माती नाला बांध दुरुस्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित शेतक-याने घेतली, तदनंतर पवनचक्की कंपनीने माती नाला बांध दुरुस्त करुन दिला व तालुका कृषी अधिकारी, विटा यांनी पहाणी केली असुन सद्यःस्थितीत माती नाला बांध हा सुस्थितीत आहे.
(४) माती नाला बांध हा सुस्थितीत आहे.

-----------------

**मौजे तिड्डी (जि.भंडारा) या वैनगंगा व कन्हान या दोन नद्यांच्या संगमावरील गावांच्या पुनर्वसनाबाबत**

**(७०) * ९७५० श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील वैनगंगा व कन्हान या दोन्ही नद्यांच्या संगमाजवळ असलेल्या तिड्डी या गावाला १९९४ मध्ये महापुराने वेढा घातला होता तेव्हापासून तिड्डी या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी शासनदरबारी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोसे धरणाचे पाणी अडविल्यामुळे नदीचे पात्र वाढून परत हे गांव वाहून जाण्याची शक्यता वर्तविली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास

आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील २० वर्षापासून प्रलंबित असलेल्या तिडडी या गावाचे पुनर्वसन करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर व परभणी जिल्हयातील दुष्काळग्रस्तांसाठी जाहीर केलेली मदत अद्याप पूर्णपणे मिळालेली नसल्याबाबत**

**(७१) * ६०११ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहूल मोटे (फरांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बच्चू कडू (अचलपूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील दुष्काळग्रस्तांसाठी शासनाने पहिल्या टप्यात २००० कोटींची मदत जाहीर केली असून त्यापैंकी ११० कोटी रुपये नागपूर जिल्हयाला प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ११० कोटी रुपयांपैकी आतापर्यंत फक्त १३ कोटी रुपये शेतक-यांच्या बँक खत्यात जमा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परभणी जिल्हयात रब्बी व खरिप हंगामात पिके गेल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याकरिता प्रशासनाने अडीचशे कोटीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून त्यापैकी ९५ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास , त्यात काय आढळून आले व राज्यातील आपदग्रस्त शेतक-यांना त्वरित मदत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

नागपूर जिल्हयास २२१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी रु.१०४.७६ कोटी इतका निधी शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

परभणी जिल्हयात रब्बी व खरिप हंगामात गारीपीटीमुळे पिके गेल्याने बाधीत

शेतक-यांना आर्थिक मदतीसाठी जिल्हा प्रशासनाने शासनाकडे कोणताही प्रस्ताव पाठविलेला नाही.

खरीप हंगाम २०१४ मधील बाधीत शेतक-यांना आर्थिक मदत देण्याकरिता एकूण रु.१९०.७५ कोटी एवढा निधी देण्यात आला आहे. त्यापैकी रु.१०५.१८ कोटी इतका निधी शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

(४),(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील डोंगराळ व दुर्गम भागात अतिवृष्टी व सततच्या भूकंपामुळे जमिनीला भेगा व तडे गेले असल्याबाबत**

**(७२) * १२४३६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कोळकेवाडी-बोलाडवाडी, बौध्दवाडी हे गावठाण डोंगराळ व दुर्गम भागात असून कोळकेवाडी धरणाच्या तीरावर वसलेले असून अतिवृष्टी व सततच्या भूकंपामुळे या भागातील जमिनीला सुमारे ५/६ फुटाच्या भेगा/तडे गेले असल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाने यापूर्वीही पाहणी करुन गावठाणामध्ये राहणे अत्यंत धोकादायक असल्याचे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही दिवसांपूर्वी माळीण (पुणे) येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशी धोकादायक घटना टाळण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार पत्रव्यवहार करुन योग्य त्या तातडीच्या उपाययोजना करणेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) याबाबतच्या पाहणीमध्ये मौजे कोळकेवाडी येथील बोलाडवाडीतील ५४ घरांना धोका संभवत असल्याचे दिसून आले आहे.

(३) व (४) याबाबत ग्रामस्त, लोकप्रतिनिधी यांचे समवेत उप विभागीय अधिकारी, चिपळूण यांचे स्तरावर बैठक संपन्न झाली होती. तथापि, ग्रामस्थांनी सोलापूर येथे उपलब्ध जागेत जाण्यास नकार दिलेला आहे. तथापि, अन्य पर्यायाची छाननी चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे केळणी (ता.कल्याण, जि.ठाणे) गावचे पोलीस पाटलांनी कार्यालयातील दप्तरात खाडाखोड करून स्वतःच्या नावे बनावट फेरफार केल्याबाबत**

**(७३) * ७२५० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण तालुक्यातील मौजे केळणी येथील सर्व्हे नं.४०/१ ही जमीन केळणी गावचे पोलीस पाटलांनी शासकीय अधिका-यांना हाताशी धरून तलाठी कार्यालयातील दप्तरात खाडाखोड करून स्वतःच्या नावे करून बोगस फेरफार नोंद केल्याचे माहे जोनवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार तलाठी कार्यालयातील दप्तरात खाडाखोड करून दुस-याची जमीन हडप करणा-या केळणी गावाच्या पोलीस पाटलांवर व त्याच्याशी संगनमत करणा-या महसूल विभागातील अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप चौकशी करून कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) ता.कल्याण येथी केळणी गावाचे पोलीस पाटील श्री.शिवनाथ मंगल भोईर यांनी मौजे केळणी येथील सर्व्हे ४०/१ब या जमिनीचा त्यांचे स्वतःचे हस्ताक्षरात नवीन गाव नमुना नंबर ७/१२ तयार करुन तो मूळ गाव नमुना ७/१२ वर चिकटविला असल्याचे मूळ अभिलेखा खाडाखोड केलेली असल्याचे सन २०१३ मध्ये निदर्शनास आले. त्यानुषंगाने केळणी गावचे पोलीस पाटील श्री.शिवनाथ मंगल भोईर यांना उप विभागीय अधिकारी, कल्याण यांनी दिनांक २३/०२/२०१५ च्या आदेशान्वये पदावरुन निलंबित केले आहे. तसेच, संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना तहसिलदार, कल्याण यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वर्धा येथील नगरपरिषदेच्या हद्दीत येत असलेल्या लक्ष्मीनगर भागातील ले-आऊटमधील मोकळ्या जागेबाबत**

**(७४) * ५९०५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा येथील नगरपरिषदेच्या हद्दीत येत असलेल्या लक्ष्मीनगर भागातील ले-आऊटमधील मोकळी जागा तत्कालीन महसूलमंत्र्यांच्या आदेशान्वये ले-आऊट मालकांच्या नावावर पुन्हा

करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मोकळया जागेवर नगरपरिषदेने कुंपण भिंत, हायमास्ट लाईट लावून नागरिकांना वापरण्यासाठी ठेवली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील जागा ले-आऊट मालकाने सरळ मा.महसूल मंत्र्यांकडून आदेश आणून भूमीअभिलेख कार्यालयातूनच या जागेचे प्रॉपर्टी कार्ड तयार केल्याने या भागातील नागरीक संतप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असल्यास, संबंधितांवर काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) (३) व (४) जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या दि. १८.०३.१९८५ च्या आदेशान्वये प्रश्नाधीन वर्धा शिट क्र. ५-ड भुखंड क्र. ६७५३ /१ या मिळकतीवर श्रीमती कोना एंकुबाई आर.बी.नायडू ऊर्फ लक्ष्मीबाई नायडू रा.वर्धा तसेच ६७५३ /२ या मिळकतीवर संतोषकुमार चंद्रशेखर नायडू रा. वर्धा अशी नोंद केली होती.

उपरोक्त दि. १८.०३.१९८५ चे आदेश अधीक्षक, भूमि अभिलेख वर्धा यांनी पुनरीक्षणात घेवून दि. १९.१०.२००६ रोजी सुधारित आदेश दिले व उपसंचालक, भुमी अभिलेख, नागपूर यांनी दि. १८.०६.२००९ च्या आदेशान्वये अधीक्षक, भूमि अभिलेख वर्धा यांचे उपरोक्त आदेश अपीलात कायम ठेवले.

यासंदर्भात मा. मंत्री (महसूल) यांचेकडे प्राप्त फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दि. २६.०६.२०१३ च्या अर्धन्यायिक आदेशाद्वारे अधीक्षक, भूमि अभिलेख वर्धा यांचे दि.१९.१०.२००६ रोजीचे व उप संचालक भूमी अभिलेख नागपूर यांचे दि. १८.१०.२००९ रोजीचे आदेश रद्द करुन अर्जदाराचा फेरतपासणी अर्ज मंजूर केला आहे.

सदर अर्धन्यायिक आदेशाविरुध्द नगर परिषद वर्धा यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे अपील दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मासेमारीच्या मोसमात ओएनजीसीद्वारे होणा-या तेल सर्वेक्षणाबाबत

**(७५) * ६४३७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रात तेलाचे साठे शोधण्यासाठी ओएनजीसीने वसई, अर्नाळा, सातपाटी या सागरी पट्टयात ऐन मासेमारीच्या हंगामात मच्छिमारांशी कोणत्याही प्रकारे चर्चा न करता सर्वेक्षण सुरू केल्यामुळे मच्छिमार संघटनांनी सर्वेक्षणाला विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने  चौकशी व पाहाणी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने मच्छिमारांचे होणारे नुकसान पाहता शासनाने याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापी, कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) स्थानिक मच्छिमार व मच्छिमार संघटनेच्या विनंतीनुसार प्रस्तावित सर्वेक्षण पुढे ढकलण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**अकोल्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ परिसरातील चंदनाचे झाड दिवसाढवळया तोडल्याबाबत**

**(७६) * ८२१४ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोल्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ परिसरातील चंदनाचे झाड दिवसाढवळया तोडून नेल्याचा प्रकार दिनांक ४ जानेवारी,२०१५ रोजी सायंकाळी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती  सदरहू चंदनाच्या झाडाची कत्तल करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) याबाबत सिव्हील लाईन, पोलीस स्टेशन, अकोला येथे अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

-----------------

**शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील बस स्थानके मोडकळीस आल्याबाबत**

**(७७) * ६२९२ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील इनामगाव, मांडवगण फराटा, आंबळे इ. गावांमध्ये राज्य परिवहन महामंडळाचे बसस्थानक मोडकळीस आल्याने धोकादायक स्थितीत उभी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींनी एस.टी. महामंडळास बसस्थानकासाठी ३०-४० वर्षापूर्वी जागा बक्षीसपत्र करुन महामंडळाच्या नावावर करुन दिल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरुर तालुक्यातील अनेक गावातील बसस्थानके मोडकळीस आल्याने प्रवासी, महिला, शाळकरी मुले व ज्येष्ठ नागरिकांना उन्हा-पावसात तासनतास एस.टी. बसची वाट पाहत ताटकळत उभे रहावे लागते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मोक्याच्या ठिकाणी असलेल्या एस.टी. महामंडळाच्या जागेवर नव्याने बसस्थानक बांधण्यासाठी पुणे जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शिरुर तालुक्यातील मोडकळीस आलेली बसस्थानके नव्याने बांधण्याबाबत निधी उपलबध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशतः खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील इनामगाव व मांडवगण फराटा, आंबळे येथे रस्ता हद्दीमध्ये मार्ग निवारे आहेत. सदर मार्ग निवारे जुने झाल्याने जिर्ण झाले आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) शिरुर तालुक्यातील सर्व रा.प. मार्ग निवा-यांची तपासणी करुन आवश्यकतेनुसार नविन मार्गनिवारे बांधण्याची व जुने मार्गनिवारे दुरुस्त करण्याकरीता स्थानिक विकास कार्यक्रमामधून निधी मिळवण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांच्या जागा महानगरपालिकेच्या परिवहन सेवेसाठी देण्याबाबत**

**(७८) * ९०५७ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे १६ लाख लोकवस्तीसाठी वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे सुमारे ८० टक्के वाहतुक सेवा पुरविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील राज्य परिवहन महामंडळाची शहरी बस वाहतुक मोठया प्रमाणावर कमी झाल्यामुळे विरार, नालासोपारा, वसई रोड (नवघर), वसई आणि अर्नाळा येथील प्रशस्त बस स्टॅन्डमधील जागा विनावापर पडून असल्याने त्यातील काही जागेचा वापर वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागाच्या बस स्टॅन्डसाठी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे राज्य परिवहन महामंडळाकडे ३ वर्षापूर्वी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विरार, नालासोपारा, वसई रोड (नवघर), वसई आणि अर्नाळा येथील परिवहन महामंडळाच्या बस स्टॅन्डमधील काही जागा वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागाच्या बस स्टॅन्डसाठी देण्यास परिवहन महामंडळकडून टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन विभागाच्या बस स्टॅन्डसाठी सदरहू जागेपैकी मागणी केलेली क्षेत्र विनाविलंब उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**नोव्हेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे नाशिक जिल्हयातील १२ हजार एकरावरील पीकांचे तसेच फळबागांचे सुमारे २२५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत**

**(७९) * ६६८५ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील १२ हजार एकरावरील द्राक्ष, टोमॅटो, डाळींब, सोयाबीन, कांदे इत्यादी पीकांचे तसेच फळबागांचे नोव्हेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे सुमारे २२५

कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज झाला असून प्रभारी जिल्हाधिकारी यांनी सर्व तहसिलदारांना पंचनामा करण्याचे आदेश १६ नोव्हेंबर २०१४ च्या सुमारास दिले हे खरे आहे काय,

(२) जळगाव जिल्हयातील दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे ५०२ गावातील २१ हजार ७२९ शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

(३), (४) व (५) राज्यात नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक आपत्तीमूळे नाशिक, जळगाव सह एकूण ९ जिल्हे बाधीत झालेले होते. त्यातील नुकसानग्रस्त क्षेत्राच्या पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण झालेली असून त्यानुसार शासनाने दिनांक ४/०२/२०१५ रोजीच्या आदेशानुसार कोरडवाहू शेतीपिकांना रु.१०,०००/- प्रति हेक्टर, आश्वासीत सिंचनाखालील पिकांना रु. १५,०००/- प्रति हेक्टर व बहुवार्षिक पिकांना (फळबाग) रु.२५,०००/- प्रति हेक्टर अशी मदत जाहीर केलेली आहे.

-----------------

## महाड तालुका (जि.रायगड) येथील अनधिकृत सुरु असलेल्या दगड खाणीच्या उत्खननाची चौकशी करणेबाबत

**(८०) * ८०८२ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील अनधिकृत दगड खनीज उत्खननाची चौकशी करणेबाबत तालुक्यातील जनाधार सामाजिक संस्थेतर्फे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खाणींमुळे होणा-या प्रदुषणाबाबत प्रदुषण नियंत्रण मंडळ व महसूल विभागाकडे लेखी तक्रारी करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४)असल्यास त्यानुसार दगड खाणी मालकांवर व दुर्लक्ष करणा-या प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि महसुल विभागातील संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) जनाधार सामाजिक संस्थेतर्फे असे निवेदन जिल्हाधिकारी रायगड, उपविभागीय अधिकारी महाड किंवा तहसिलदार महाड यांच्या कार्यालयात, प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाड येथील उपप्रादेशिक कार्यालयातही खाणीमुळे होणा-या प्रदूषणाविषयी लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे शहरातील सुभाषनगर, पोखरण येथे विकासकाने शासनाकडून कोणतीही परवानगी न घेता झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरु केल्याबाबत**

**(८१) * १०६८६ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील सुभाषनगर, पोखरण रोड क्र.२ येथील सर्व्हे क्रमांक ५०९ व ५०१० या शासकीय जमिनीवर महाकाली डेव्हलपर्स नामक विकासकाने झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचे शासनाकडून कोणतीही परवानगी न घेता काम सुरु केले असून या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.गृहराज्यमंत्री, तसेच दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी मा.सहकार मंत्री व मा.सहकार राज्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**राज्यात पाऊस, गारपीट आणि गारठा निर्माण झाल्याने शेतीपिकाचे व फळांचे नुकसान झाल्याबाबत**

**(८२) * ६०३४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी),**

**श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्रीमती निर्मला गावीत (इगतपूरी), श्री.सुरेश भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः नागपूर , ठाणे, पालघर, सांगली, सोलापूर, हिंगोली, नाशिक सह कोकण भागातील ऑक्टोबर, नोव्हेंबर, २०१४ मध्ये झाले असून अवकाळी पावासामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, ज्वारी, भुईमुग, भात तसेच द्राक्षे, मोसंबी, डाळींबे इत्यादी पिके व फळभागांच्या झालेल्या नुकसानी बाबत शेतक-यांना नुकसानीचे भरपाई देण्यासाठी शेतपिके व फळबागांच्या नुकसानाचे पंचनामे शासनास प्राप्त झाले आहेत काय,

(२) कोकणात माहे ऑक्टोबर - डिसेंबर, २०१४ मध्ये अवकाळी पाऊस पडून भातशेतीसह आंबा, काजू पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन देखील रत्नागिरी कृषि विभागाने नुकसान अहवाल निरंक दाखवून १९ कोटी रुपये शासनास परत पाविण्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने देण्याबाबत तसेच शेतकऱ्यांचे पीकाचे व फळांचे झालेले नुसानाची भरपाई देण्याबाबत तसेच कोकणातील भातशेतीसह आंबा, काजू बागांचे नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. राज्यात ब-याच ठिकाणी नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे शासनास प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ मध्ये अवकाळी पावसामुळे कोकण विभागातील रायगड जिल्ह्यामध्ये भातपिकाचे व आंबा पिकाचे नुकसान झाले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात नुकसान झालेले नाही.

(४) व (५) शासन निर्णय, दि. ४ फेब्रुवारी, २०१५ अन्वये विशेष स्वरुपात शेतक-यांना मदत जाहीर करण्यात आली असून, नुकसानीच्या पंचनाम्यानुसार मदत देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील कृषीपंपाच्या वीज बिलाची थकबाकी वाढत असल्याबाबत**

**(८३) * ५७९७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषीपंपाच्या वीज बिलाची थकबाकी वाढत असून आता ही रक्कम १० हजार ८०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी कृषिपंपाना सरासरी २४०० कोटी रुपयांची आकारणी होत असताना वसूली मात्र सुमारे ९०० कोटी रुपये होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दर तीन महिन्याला एकदा बिल आकारणी होत असून काही शेतक-याच्या दबावामुळे आणि महावितरणची वीजबिल वसुलीतील अकार्यक्षमता यामळे दरवर्षी कृषीपंपाच्या दोन तृतीयांश वीलबिलाची वसूलीच होत नसल्याचे आढळून येत आहे, हे सुध्दा खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वीज बिलाची वसूली पूर्ण करण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(५) अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) राज्यातील थकबाकीदार ग्राहकांच्या वसुलीकरीता महावितरण कंपनी नेहमी प्रयत्नशील असून शासनाकडूनही कृषी ग्राहकांना वीज बिले भरणा करणेबाबत वेळोवेळी आवाहन केले जाते. कृषी ग्राहकांवरील वीज बिलाच्या थकीत रक्कमेचा बोजा कमी करण्याकरीता शासनाने दि.१९.६.२०१४ नुसार "कृषी संजीवनी योजना-२०१४" राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमध्ये भाग घेणा-या कृषी ग्राहकाचे ३१.०३.२०१४ रोजी थकीत असलेले पुर्ण व्याज व दंड हे महावितरण कंपनीतर्फे माफ करण्यात येईल. सदर योजनेची मुदत ३१.०३.२०१५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विज महावितरणाचे लातूर परिमंडळातील मुख्य अभियंता व वरिष्ठ व्यवस्थापक लेखा व वित्त यांना निलंबित केल्याबाबत**

**(८४) * ११७७० श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विज महावितरणाचे लातूर परिमंडळातील मुख्य अभियंता व वरिष्ठ व्यवस्थापक लेखा व वित्त, यांना ऑक्टोबर २०१४ मध्ये निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा न काढता कोटयावधी रुपयांची खरेदी केल्याच्या आरोपावरुन त्यांना निलंबित करण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार दोषीं असणा-या व्यक्तीवर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय
(२) होय
(३) सदर प्रकरणाच्या प्राथमिक चौकशी अहवालाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता आणि वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांना दि.२७.१०.२०१४ रोजी निलंबीत करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी विभागीय चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, कसुरदार कर्मचा-यांची विभागीय चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) येथील आदिवासी जमीन बिगर आदिवासी असलेल्या पालाभाई हरिभाई राणा यांनी संगनमत करुन बळकावली असल्याबाबत**

**(८५) * ७२६४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) येथील मौजे मसोळी स.नं.१८५ ही आदिवासी जमीन बिगर आदिवासी असलेल्या पालाभाई हरिभाई राणा यांनी शासकीय अधिकारी यांना हाताशी धरून जमीन बळकावण्याचा प्रयत्न केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तदनुसार पालाभाई हरिभाई राणा या बिगर आदिवासी इसमावर व त्याच्याशी संगनमत करणा-या सरकारी संबंधित अधिका-यांवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील मौजे मसोळी येथील स.नं. १८५ या आदिवासी खातेदाराकडील जमिनी पैकी ०.४९ हे. आर जमीन श्री.पालाभाई हरिभाई राणा यांना शेतीच्या प्रयोजनार्थ विकण्याची परवानगी अप्पर जिल्हाधिकारी जव्हार, जि. ठाणे यांनी दि. १७/७/२००० च्या आदेशान्वये दिली होती. सदर खरेदीदार श्री.पालाभाई हरिभाई राणा यांच्याकडे तालुका दंडाधिकारी डहाणू यांनी दि.३/५/१९९४ रोजी दिलेल्या अनुसुचित जमातीचा दाखला आहे. सदर दाखल्याची वैधता तपासण्यात आली आहे किंवा कसे याविषयी शहानिशा करण्यास जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले असून जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले असून जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथे किनारपटटीवर आलेल्या उधानाने नुकसानग्रस्त मच्छिमारांना आर्थिक मदत मिळणेबाबत**

**(८६) * ८०८३ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण, जि.सिंधुदुर्ग येथे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास किनारपट्टीवर आलेल्या उधानामुळे मच्छिमारांच्या होड्या व इतर साहित्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानीबाबत शासनाकडून पंचनामे करण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, या मच्छिमारांना पंचेनामे नुसार आतापर्यंत किती मदत देण्यात आली, आहे, वा देण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.